## प्रकरण चार

## शैक्षणिक कार्य

## प्रकरण चवथे

## शैक्षणिक कार्य

आर्य समाजाची चळवळ ही जशी सामाजिक व धार्मिक सुधारणांची चळवळ होती तशीच ती शैक्षणिक प्रसाराचीही चळवळ होती. म्हणूनच आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक कार्याइतकेच शैक्षणिक कार्यालाही महत्व दिले. आर्य समाजाने ठिकठिकाणी गुरुकुले, शाळा, विश्वविद्यालये स्थापन केली. याचा मराठवाडयातसुध्दा आर्य समाजाच्या शैक्षणिक कार्याचा प्रसार झाला. मराठवाडयात आर्य समाजाच्या शैक्षणिक कार्याचा ठसा मोठया प्रमाणात उमटल्याचे आजही स्पष्ट होत आहे. इ.स. १८९२ मध्ये आर्य समाजाची दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज गट आणि गुरुकुल गट अशा दोन गटात विभागणी झाली. पहिल्या गटाचे नेते लाला हंसराज यानी लाहोरला दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज (डी.ए.व्ही. कॉलेज) स्थापन करून इंग्रजी शिक्षणाबरोबरच वैदिक तत्वांच्या प्रचाराचे कार्य हाती घेतले. तर स्वामी दयानंदाच्या तत्वप्रणाली प्रमाणे फक्त वैदिक शिक्षणच द्यावे असे प्रतिपादन करणाऱ्या गटाने स्वामी श्रध्दानंदांच्या नेतृत्वाखाली गुरुकुलाची स्थापना केली. महाराष्ट्रात सोलापूर, मुंबई यासारख्या ठिकाणी आर्य समाजाने प्रचंड विस्ताराच्या शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. मराठवाडयामध्ये आर्य समाजाने गुरुकुले व शैक्षणिक संस्थांची उभारणी करून शिक्षण प्रसार केला. हा प्रसार व्यापक प्रमाणात झाला नसला तरी त्यातून आर्य समाजाची शैक्षणिक कार्याबाबतची आस्था दिसून येते. प्रस्तुत प्रकरणात आर्य समाजाने मराठवाडयात शिक्षण प्रसाराचे जे कार्य केले त्याची चर्चा करून आढावा घ्यायचा आहे.

हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाची स्थापना प्रथम मराठवाडयातच झाली. तसेच मराठवाडयातच आर्य समाजाच्या अनेक उपक्रमांचा शुभारंभ झाला. आर्य समाजाने सामाजिक व धार्मिक जागृती बरोबरच शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून फार मोठया प्रमाणात लोकजागृती केली आहे, हे विसरता येणार नाही.

मराठवाडयामध्ये आर्य समाजाने शिक्षण प्रसाराच्या कार्यात मिळवलेल्या उल्लेखनीय यशाची आवर्जून नोंद घ्यावी लागते. परंतु तत्पुर्वी हैद्राबाद संस्थानांतर्गत शैक्षणिक स्थिती कशी होती याचा धावता आढावा घेणे आवश्यक आहे.

निजाम राजवटीमधील शैक्षणिक स्थिती :

मीर उस्मान अली खान याच्या कारकीर्दिपूर्वी हैद्राबाद संस्थानामध्ये एकंदर स्थिती चांगली होती. त्याच्या पूर्वीचा निजाम मीर मेहबूब अली खान हा मुस्लीमांइतकाच हिंदूंनाही प्रिय होता. शिवाय त्याच्या काळात हिंदूंना सामाजिक व धार्मिक कार्य करण्यास स्वातंत्र्य मिळत असे. त्याच्याच काळात हैद्राबाद संस्थानात विशेषत: मराठवाडयात आर्य समाजाच्या प्रयत्नाने ब-याच ठिकाणी ग्रंथालये, वाचनालये, व्यायामशाळा, खाजगी शाळा यांची स्थापना झाली. मात्र मीर उस्मान अली इ.स. १९११ मध्ये सत्तेवर आल्यापासून अशाप्रकारच्या आर्य समाजी संस्थांच्यावर कडक निर्बन्ध लादण्यात आले. निजामाने उर्दू भाषेची सक्ती सुरू केली तेव्हा मराठी भाषिकांच्या मराठवाडयातून निजामाच्या भाषिक धारणाला तीव्र विरोध होऊ लागला. दि. २१ ऑगस्ट १९२८ ला आर्य समाजी कार्यकर्ते श्री. केशवराव कोरटकर यांच्या अध्यक्षतेखाली `जनता शिक्षण परिषदे` ची स्थापना करण्यात आली. उर्दू भाषेची सक्ती रद्द करून मातृभाषेच्या शिक्षणाची व्यवस्था व्हावी व निजामाच्या बंधनाविरूध्द लोकमत संघटित व्हावे हा या परिषदेचा हेतू होता. या परिषदेची एकूण पाच अधिवेशने झाली. त्यामध्ये चार हैद्राबादला व एक परभणी येथे झाले. अशा परिषदेमुळे उर्दू भाषेच्या सक्तीबाबत काहीच उपाय झाला नाही. परंतु खाजगी शाळांना मात्र परवाने मिळू लागले.

मराठवाडयात खाजगी-राष्ट्रीय शाळांनी स्वातंत्र्य आंदोलनाला बळ देण्याचे व लोकांच्या मनात देशप्रेमाची भावना जागृत ठेवण्याचे फार मोठे कार्य केले. पण लवकरच सरकारने अशा खाजगी शाळांच्याबाबत असणारा जुना कायदा रद्द करून नवा कायदा केला. नव्या कायद्याच्या तरतुदीमुळे जुन्या गावठी शाळांची

संख्या हजारोंनी घटली. अशा लहान मोठया खाजगी शाळेला परवानगी देण्याचे अधिकार सरकारने स्वत:कडे म्हणजेच मंत्रिमंडळाकडे घेतले. उर्दू खेरीज अन्य माध्यमांच्या शाळांना परवानगी द्यावयाची नाही व सरकारी अभ्यासक्रमाखेरीज अन्य बाबी शिकवणाऱ्या इतर माध्यमाच्या शाळा चालू द्यावयाच्या नाहीत असे सरकारी धोरण होते. मुलांनी मराठी शिकू नये. त्यांना उर्दू शिकणेच भाग पडावे असा सरकारी धोरणाचा खाक्या होता. " मराठवाडयाच्या पाचही जिल्हात १९३५ च्या पुढे सुमारे १५ ते २० खाजगी शाळा सरकारी कायद्याची तमा न बाळगता निघाल्या. त्या आधी १९१६ ते १९३५ पर्यन्त अशा शाळांची संख्या संपूर्ण मराठवाडयावर ६-७ च्या घरात होती."[१] हिप्परगा (नरसोबाचे) जि. उस्मानाबाद ( १९२१), नूतन विद्यालय, सेलू (१९३८), शामलाल स्मारक विद्यालय, उदगीर (१९३७), भारत विद्यालय उमरगा (१९४१), पैठण, औरंगाबाद, आंबेजोगाई इ. अनेक ठिकाणी खाजगी संस्थांनी शिक्षणाची चळवळ सुरू केली होती. त्यातील श्यामलाल स्मारक विद्यालय, उदगीर आणि नूतन विद्यालय, उमरी या शैक्षणिक संस्था आर्य समाजाच्यावतीने चालवल्या जात होत्या. मीर उस्मान अली खाँ व त्यांचे प्रधान, " आम्ही शिक्षणासाठी पाण्यासारखा पैसा खर्च करतो " असा प्रचार करीत. पण प्रत्यक्षात मात्र पंधरा टक्क्यांच्यावर रयतेला शिक्षण मिळू नये अशी निझामी राजवटीची व्यवस्था होती. संबंध संस्थानात केवळ त्रेचाळीस हायस्कूल होती. एकशे आठ मिडल स्कूल व दोन हजार नऊशे स्कोणऐंशी प्रायमरी शाळा होत्या. उस्मानीया युनिव्हर्सिटी, निझाम कॉलेज आणि सहा इंटरमिजिएट कॉलेज एवढीच शिक्षणाची सोय होती. दहा टक्क्यापेक्षा अधिक प्रजेला शिक्षण मिळू नये असे निझामाचे कडक धोरण होते.[२] प्रजेत शिक्षणाचा प्रसार झाला तर लोकशाही राज्यव्यवस्थेसाठी, स्वातंत्र्यासाठी ते आपल्याविरूध्द बंड करतील या भयाने शिक्षणाबाबत दक्षता निजामी शासक घेत होते.

सरकारी शाळांतून पाचव्या इयत्तेपासून पुढे मराठी, तेलगू, कानडी इ. देशी भाषांच्या माध्यमातून शिक्षण घेण्यासाठी बंदी होती. संस्कृतला तर कोणी वालीच नव्हता. त्यामुळे संस्कृत भाषेत पांडित्य संपादन करणाऱ्या धर्म पंडितांची परंपरा खंडीत झाली होती. नांदेड, उदगीर येथील संस्कृत पाठशाळा कशाबशा तग धरून होत्या अशाप्रकारे निजामाच्या काळात संस्थानावर इस्लामी प्रभाव टिकून राहील अशाच शैक्षणिक माध्यमावर भर दिला जात होता.

इ.स. १९१५ पूर्वी हैद्राबाद संस्थानात दुय्यम व उच्च शिक्षणाच्या दोन पध्दती होत्या. त्यापैकी एक उर्दू भाषेच्या माध्यमातून शिक्षण देणारी व दुसरी इंग्रजी भाषेद्वारे. पहिल्या पध्दतीत इस्लामी संस्कृती व इस्लामी ग्रंथ यांच्या अभ्यासावर विशेष भर दिला जात असे. तर दुसऱ्या प्रकारच्या शाळांमध्ये बहुतेक मुसलमानेत्तर विद्यार्थ्यांचा समावेश असे. अशाप्रकारच्या शिक्षण व्यवस्थेमुळे मुसलमान विद्यार्थ्यांना आपल्या मातृभाषेतून धार्मिक व व्यावहारिक शिक्षण मिळू लागले. पण मुसलमानेत्तर विद्यार्थ्यांना मात्र इंग्रजी माध्यमाशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे हिंदूंची साक्षरता घटली व मुसलमानांची वाढली. इ.स. १९११ च्या खानेसुमारीच्या रिपोर्टानुसार इ.स. १९०१ मध्ये प्राथमिक शाळांतून ८०,७४३ विद्यार्थी होते. तर इ.स. १९११ मध्ये ७६,०६५ होते. दहा वर्षां पूर्वीपेक्षा, कितीतरी पटीने अधिक प्रमाणात आज तरूण पिढी शाळेपासून दूर ठेवली जात आहे. शिक्षण पध्दतीचा मूळ पायाच जणू हादरला आहे.[3] हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

शाळांची संख्या घटली

| वर्ष | एकूण शाळांची संख्या |
|---|---|
| इ.स. १८९१ | ३१४० |
| इ.स. १९०१ | २६०७ |
| इ.स. १९११ | २२९५ |

साक्षरतेचे प्रमाण घसरले

| वर्ष | दर हजारी साक्षरता |
|---|---|
| इ.स. १८९१ | ३७.६ |
| इ.स. १९०१ | २९.५५ |
| इ.स. १९११ | २८ |

दर हजारी साक्षरता

| वर्ष | हिंदू | मुसलमान | इतर |
|---|---|---|---|
| इ.स. १९०१ | २५.३६ | ५४.६४ | २९ |
| इ.स. १९११ | २.३ | ५.९ | ३.६[४] |

यावरून शैक्षणिक प्रगतीतील विषमता व हिंदूंच्या बाबतचे निजामाचे शैक्षणिक धोरण स्पष्ट होते. " अखिल भारतीय पातळीवर इ.स. १९३१ च्या खानेसुमारीप्रमाणे दर हजारी साक्षरता हिंदूंची ७२ व मुसलमानांची ५४ तर हैद्राबादेत ती अनुक्रमे ४०.६ व १०१ आणि फक्त स्त्रियांचे साक्षरतेचे भारतीय प्रमाण हिंदू २१ व मुसलमान १५ तर हैद्राबादेत ते ७ हिंदू व २९ मुसलमान होते."[५] एकूणच एकाला मातृभाषेतून शिक्षण द्यायचे व दुसऱ्याला तसे द्यायचे नाही याच धोरणाचा हा सर्व परिणाम होता.

इ.स. १९११ ते १९४१ या काळातील मराठवाड्यातील लोकसंख्या आणि साक्षरतेचे प्रमाण खालील तक्त्यात दाखविले आहे.

| वर्ष | लोकसंख्या | साक्षरता प्रमाण (टक्केवारीत) |
| --- | --- | --- |
| १९११ | ३६,१२,५१८ | २.३ |
| १९२१ | ३२,३३,६४६ | २.४ |
| १९३१ | ३८,४५,३९२ | ३.५ |
| १९४१ | ४२,४९,२७२ | ७.५ [६] |

१९११ मध्ये मराठवाड्यात साक्षरतेचे प्रमाण केवळ २.३ टक्के होते. ते १९४१ मध्ये ७.५ पर्यन्त वाढले असे दिसत असले तरी त्यात मुसलमानांच्या साक्षरतेचाही समावेश आहे हे विसरून चालणार नाही. यावरून निजामाच्या धोरणामुळे समाज कसा अज्ञान व अंध:कारात खितपत पडला होता हे स्पष्ट होते.

शैक्षणिक दृष्टिकोनातून हिंदुस्थानातील इतर अनेक संस्थानापेक्षा हैद्राबाद संस्थान हे फारच मागासलेले होते. कारण निजाम हा कडवा व कट्टर धार्मिक होता व त्याला आपल्या संस्थानात इस्लाम धर्माचेच प्रभुत्व स्थापन करावयाचे होते. इस्लामी शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये निजामी राजवटीविषयी प्रेम निर्माण झाले पाहिजे अशी व्यवस्था शिक्षण पध्दतीत करण्यात आली होती. सरकारकडून मुस्लीम विद्यार्थ्यांना जेवढया सवलती मिळत होत्या तेवढया सवलती हिंदूंना मिळणे तर कठीण होतेच, पण त्या शिवाय शिक्षणासाठी प्रवेश मिळणेही त्याना अवघड होत असे. थोडक्यात हिंदू विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणात शैक्षणिक अवहेलना केली जात असे. त्यामुळे बहुतांशी हिंदू तरूणांना शिक्षणापासून वंचित व्हावे लागत होते.

मुसलमानांना धर्मिक शिक्षण देण्यासाठी हैद्राबाद संस्थानात विशेष शाळाही उघडण्यात आल्या होत्या. इ.स. १९३४-३५ मध्ये अशा १५ शाळा होत्या व त्यावर रू. ४३,५२५ खर्च होत होता. त्या तुलनेत वैदिक पाठशाळा केवळ ५ होत्या व त्यावर रू. ६४४ खर्च होता. हैद्राबाद राज्यामध्ये हिंदूंच्याच

वाटयाला सांस्कृतिक जीवनात दुर्भाग्याचे अनेक प्रसंग आले होते. त्यानी जेंव्हा स्वत:च्या मातृभाषेतील शिक्षणासाठी खाजगी पाठशाळांना सुरुवात केली तेंव्हा सरकारने त्यावर निर्बन्ध लादण्यास प्रारंभ केला. इ.स. १९२४ पर्यन्त अशा खाजगी शाळांवर फारसे प्रतिबंध नव्हते. पण १९२५ च्या फर्मानानुसार मात्र नव्या शाळा सुरू करण्यासाठी परवानगीची गरज आहे आणि ज्या जुन्या शाळा होत्या त्यानीसुध्दा सरकारी परवानगी घेऊनच कामकाज सुरू करावे असे जाहीर करण्यात आले. परिणामत: अनेक जुन्या शाळा बंद पडल्या तर सरकारी धोरणामुळे नव्या शाळा निघू शकल्या नाहीत.

थोडक्यात, हैद्राबाद राज्यामध्ये हिंदूंच्या शिक्षणावर अनेक निर्बन्ध होते. त्यामुळे मराठी, तेलगू, कन्नड इ. भाषिक लोकांना स्वत:च्या मातृभाषेतून शिक्षण घेण्यात अडचणी निर्माण होत होत्या. उर्दू हेच सर्व शिक्षणाचे माध्यम असल्यामुळे हिंदूंना शैक्षणिक क्षेत्रात घोर अवहेलना सहन करावी लागली. परंतु हैद्राबाद राज्यात व पर्यायाने मराठवाडयात आर्य समाजाच्या व इतर संस्थांच्या ज्या काही हाताच्या बोटावर मोजण्यासारख्या खाजगी शाळा होत्या त्यामधून हिंदू मुलांना राष्ट्रप्रेम, वैदिक संस्कृती, वैदिक धर्म व लोकशाही हक्क इ. चे शिक्षण मिळाले. अशा पार्श्वभूमीवर, निजामाची निरंकुश सत्ता असतानाही आर्य समाजाने हैद्राबाद राज्यात व मराठवाडयात शिक्षण प्रसाराचे केलेले कार्य गौरवास्पद आहे.

आर्य समाजाने मराठवाडयात गुरूकुले, कन्या शाळा, खाजगी पाठशाळा, विद्यालये, आयुर्वेद शाळा, वैदिक शिक्षण, वाचनालये, वृत्तपत्रे इ. अनेक माध्यमांतून शिक्षण प्रसार व सांस्कृतिक जागृतीचे महान कार्य केले आहे.

<u>गुरूकुल शिक्षण पध्दती</u> :

आर्य समाज पंथी लोकांची गुरूकुल ही एक शिक्षणसंस्था आहे. इ.स.१८९२ मध्ये आर्य समाजात फूट पडली. त्यानंतर समाजातील एका गटाचे नेते लाला मुंशीराम उर्फ स्वामी श्रध्दानंद यानी इ.स. १९०० मध्ये हरद्वार येथे गुरूकुल कांगडी

स्थापन केले. गुरुकुलाच्या अंतर्गत व्यवस्थेसाठी अंतरंग सभा नावाची एक लहान कमिटी असते. तीच गुरुकुलाच्या आचार्यांची नेमणूक करते. गुरुकुल विद्यालय ही शिक्षणसंस्था मुख्यत: वेद व संस्कृत भाषेच्या अध्ययनाकरिता आहे. तथापि तेथे इंग्रजी वाड्.मय, अर्वाचीन शास्त्रे व तत्वज्ञान यांचे शिक्षण दिले जाते. गुरुकुलात जातीभेदाला स्थान नसते. उपनयन विधी झालेल्या ब्रह्मचारी विद्यार्थ्यांस गुरुकुल विद्यालयात घेतले जाते. या विद्यालयाचा शिक्षणक्रम १६ वर्षांचा असून त्याच्या तीन पायऱ्या आहेत. या विद्यालयात विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण, ब्लोपासना, चारित्र्य संवर्धन, सद्गुणांची उपासना इ. बाबतचे धडे देण्यात येतात. येथे तरूण विद्यार्थ्यांच्यावर आर्य संस्कृतीचे संस्कार करण्यात येतात.

आर्य समाजाच्यावतीने हैद्राबाद राज्यात येडशी (रामलिंग), फत्तेहाबाद (किल्ले धारूर), घटकेश्वर इ. ठिकाणी गुरुकुले व काही कन्या गुरुकुले (उदा. कन्या गुरुकुल, बेगमपेठ) चालवली जात असत. त्यापैकी धारूर व येडशी या दोन गुरुकुलांचा मराठवाड्यात समावेश होतो. आर्य समाजाच्यावतीने ही गुरुकुले चालवली जात होती. गुरुकुल शिक्षण पध्दतीचा प्रभाव मराठवाड्यातील अनेक तरूण आर्य समाजी कार्यकर्त्यांवर झाला. त्यामुळे अनेक तरूण गुरुकुल पध्दतीच्या शिक्षणाकडे आकर्षित झाले. इतकेच नव्हे तर अनेकांना आर्य समाजाच्यावतीने शिक्षणासाठी गुरुकुलात पाठवण्यात आले. यावरून मराठवाड्यातील गुरुकुल शिक्षण पध्दतीचा प्रभाव स्पष्ट होतो.

गुरुकुल धारूर (फत्तेहाबाद) :

मराठवाड्यात आर्य समाजाचे पहिले गुरुकुल धारूर येथे सुरू करण्यात आले. आर्य समाजाची हैद्राबाद राज्यातील पहिली शाखा इ.स. १८९१ मध्ये धारूर येथेच स्थापन झाली. बरीच वर्षे ` धारूर आर्य समाज ` महर्षि दयानंद सरस्वतींच्या सिध्दांताचे प्रचार केंद्र होते. इ.स. १९०७ मध्ये येथे गुरुकुलाची स्थापना झाली व ते इ.स. १९२५ पर्यन्त चालले. गुरुकुल स्थापनेच्या व चालवण्याच्या कामी न्यायभूषण पं. भगवान स्वरूपजी (अजमेर) यांनी फार मोठे सहकार्य केले. या गुरुकुलाच्या

आजूबाजूस मोमीनाबाद (अंबाजोगाई) व हिंगोली येथे सैन्कि कॅम्पस् होते. आणि अधिक तर लोक हिंदी भाषिक होते. त्यामुळे येथील गुरुकुलामध्ये हिंदी भाषिक लोकांची संख्या अधिक होती.[७]

धारूर येथील गुरुकुलाच्या स्थापनेमध्ये पं.गोकुळप्रसाद तिवारी, पं.भगवान स्वरूप, तसेच पं. आचार्य शिवदत्त शर्मा इ. चा महत्वपूर्ण समावेश होता. पं.आचार्य शिवदत्त शर्मा यांच्या नेतृत्वाखाली या गुरुकुलाची स्थापना करण्यात आली. त्यावेळी नेमण्यात आलेल्या स्थानिक समितीमध्ये खालील व्यक्तींचा समावेश होता.

१) श्री.पं. बंसीधरजी तिवारी, आयुर्वेद रत्न
२) ,, नागनाथ गोपाळराव शेटे
३) ,, रामचंद्रजी सालिंगरामजी तोषणीवाल
४) ,, माणिकप्रसाद विठ्ठलप्रसाद मिश्र
५) ,, कुंजनप्रसाद मोहनलाल तिवारी
६) ,, मोहनलाल नंदकिशोर दुबे
७) ,, भवानसिंग गिरधरसिंग हजारी
८) ,, जयाप्रसाद जगन्नाथप्रसाद मिश्र
९) श्रीमती अंबाबाई गोकुळप्रसाद तिवारी
१०) श्री.पं. पंढरीनाथ नराबा चिद्रेवार
११) ,, गोपाळ विश्वनाथ रूद्रवार.[८]

स्थानिक समितीच्या सभासदांनी विचारपूर्वक गुरुकुल चालवण्याचा निर्धार केला. त्यानुसार गावातून धन-धान्य व आर्थिक मदत जमा करण्यात आली. प्रारंभी दिडशे विद्यार्थ्यांनी या गुरुकुलामध्ये प्रवेश घेतला. त्यामुळे त्यांच्या बैठकीचा आणखी एक प्रश्न पुन्हा पुढे उभा राहिला. आचार्य पं.शिवदत्त शर्मा यांच्या मतानुसार हे गुरुकुल एक तर नदीच्या किनारी अथवा एखाद्या डोंगरकपारीमध्ये असावे. पण हे फारच खर्चीक काम होते. तेंव्हा धारूर येथील आर्य समाजाचे संस्थापक

पं.गोकुळप्रसाद तिवारी यांच्या धर्मपत्नी श्रीमती पं.अंबाबाई तिवारी यांनी आपल्या चाळीतील लाकडाचे जाळीदार घर गुरुकुलासाठी विनामुल्य दिले. बरीच वर्षे गुरुकुल येथेच चालवले गेले.

गुरुकुलाची पूर्ण जबाबदारी पं.भगवान स्वरूपजी, न्यायभूषण (प्रधान, आर्य प्रतिनिधी सभा, राजस्थान) यांच्यावर होती. पंडितजी स्वत: विद्यार्थ्यांच्यावर देखरेख ठेवत असत. शिवाय नियमित व्यायाम, शिक्षण, निर्व्यसनीपणा इ. बाबत ते काटेकोर देखरेख करत असत. आजही धारूरवासियांच्या मनात पंडितजींच्या कार्याविषयी फार मोठी आदराची भावना आहे. त्यांनी संपूर्ण धारूरला वैदिक धर्माची दिक्षा दिली. गुरुकुलामध्ये धार्मिक व प्रशासकीय स्वरूपाचे शिक्षण दिले जात होते. निजामाची राजवट असतानाही गुरुकुल चालवण्यामध्ये आर्य समाज धारूरने फार मोठे मनोधैर्य दाखवले. मात्र हळूहळू त्यामध्ये शिथिलता येऊन गुरुकुल बंद झाले. आर्य समाज धारूरचे वर्तमान मंत्री श्री. प्रमोद प्रसाद तिवारी म्हणतात, " श्री.लंबो काझी सरीखे (टोपन नाव, मूळ नाव माहित नाही) यासारखी मुस्लीम शिक्षकही गुरुकुलामध्ये विद्यार्थ्यांना शिकवत होते. अशा गुरुकुल पध्दतीच्या शिक्षणाचा प्रभाव पाहून केज तहसील मधील श्री. रामरावजी देशपांडे यांनी आर्य समाजास पश्चिमेकडील आठ एकर जमीन (सर्व्हे नं. ३४४) दान म्हणून दिली. त्यामध्ये दयानंद व्यायाम शाळा, आर्य समाज शाखा इ. चा समावेश आहे."[१] इ.स. १९४८ मध्ये पं.नरेंद्रजी सक्सेना, मंत्री, आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद राज्य, यानी किल्ले धारूरला भेट दिली.

गुरुकुल, येडशी :

मराठवाडयामध्ये आर्य समाजाच्यावतीने गुरुकुल, येडशी या नावाने दुसरे एक गुरुकुल चालवले जात होते. आज गुरुकुल रामलिंग या नावाने महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेच्यावतीने येडशी जवळच हे गुरुकुल चालवले जाते. पं. बंसीलालजी तिवारी यांच्या नेतृत्वाखाली हे गुरुकुल चालवले जात होते. त्यासाठी रामलिंग गुरुकुलाच्या

नावाने सहा एकर जमीनही रजिस्टर करून मिळाली होती. पं. नंदलालजी यांचा त्यामध्ये सिंहाचा वाटा होता.[१०]

इ.स. १९४० मध्ये भाई बंसीलालजीयानी आर्य प्रतिनिधी सभेचे मंत्रीपद सोडल्यानंतर ते शैक्षणिक प्रसाराच्या कार्याकडे वळले. किंबहुना ऋषीमुनींच्या सारखे जीवन व त्यांच्या शिक्षण संस्थेसारखे गुरुकुल स्थापन करण्याचा त्यांचा मनोदय होता. त्याप्रमाणे आपले बंधू हुतात्मा भाई पं.शामलालजी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यानी ` श्यामार्य गुरुकुल ` या नावाने मराठवाड्यात राजूरा येथे २ ऑगस्ट १९४८ मध्ये गुरुकुलाची स्थापना केली. ही स्थापना करण्यामध्ये पं. मनोहरलालजी यानी पुढाकार घेतला. त्यानी श्री. हनुमंतराव पाटील यांच्या मदतीने गुरुकुल स्थापन केले. हेच गुरुकुल पुढे बार्शीजवळ येडशीला हलविण्यात आले. रझाकारांच्या उपद्रवामुळे ` श्यामार्य गुरुकुल ` येडशी येथून बार्शीकडे नेण्यात आले. पण तेथेही गडबड झाल्यामुळे पं. बंसीलाल बार्शीहून हे गुरुकुल आपल्या सहकारी शिष्यांसमवेत अहमदनगरकडे घेऊन जात असतानाच जेऊर येथे त्यांचे कॉल-याच्या साथीने ७ ऑगस्ट १९४८ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाबाबत अनेक तर्कवितर्क केले जातात. त्यांच्या बरोबर त्यांचे जुने सहकारी श्री. रामचंद्र नलगीरकर व त्यांची वेदव्रत (वेदभूषण) व सत्यव्रत ही मुले होती. जेऊर हे ठिकाण बार्शी-अहमदनगर रस्त्यावर बार्शीपासून सुमारे ६० ते ७० मैल अंतरावर आहे. तेथेच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. हे गुरुकुल पुढे पं. शामलाल व पं.बंसीलालजी या दोघांचेही चिरंतन स्मारक राहिले.[११] थोडक्यात पं.बंसीलालजी यांनी स्थापन केलेले ` श्यामार्य गुरुकुल ` राजुरा, येडशी, बार्शी इ. ठिकाणी स्थलांतरीत झाले. पुढे २ ऑगस्ट, १९४९ मध्ये हे गुरुकुल पुन्हा उदगीर येथे सुरू झाले. पं. बंसीलालजी यांचे संस्कृतवर फार मोठे प्रभुत्व होते. ते नेहमी म्हणत की, संस्कृतही आपली घरची भाषा झाली पाहिजे. त्यांनी स्वत:च्या घरी संस्कृत संभाषणे सुरू केली. याशिवाय गुरुकुलामध्ये वेदाभ्यास करणा-या ब्रह्मचार्यांनाही

त्यांनी संस्कृत भाषाच मुखोद्गत करून घेतली. श्री.पं. ऋभुदेवजी आचार्य हे यज्ञ शाळेचे पुरोहित येडशीच्या गुरुकुलांमध्ये होते. थोडक्यात भाईजीनी श्यामार्य गुरुकुलाद्वारे संस्कृत भाषेला प्राधान्य देऊन आर्य समाजाच्या शैक्षणिक कार्याचा प्रभाव तत्कालीन हैद्राबाद राज्यात निर्माण केला व हिंदु संस्कृतीचे रक्षण केले.

मराठवाडयामध्ये वरील दोन गुरुकुले चालू होती. याशिवाय हैद्राबाद राज्यात इतर ठिकाणीही गुरुकुल शिक्षण पध्दतीचा प्रारंभ आर्य समाजाने केला. मराठवाडयामधून अनेक आर्य समाजी तरूण उत्तर भारतातील गुरुकुलामध्ये शिक्षण घेण्यासाठी गेले. त्यामुळे मराठवाडयातील आर्य समाजाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यास गती यायला मदत झाली.

<u>मराठवाडयातील गुरुकुलाचे स्नातक</u> :

आर्य समाजाचे स्वरूप आणि कार्य लक्षात घेऊन हजारो स्त्री पुरूषांनी आर्य समाजाचा वैदिक आणि राष्ट्रीय विचार जनमानसात रूजविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. आर्य समाजाचे हे संघटन सहन न झाल्यामुळे निजाम सरकारने अनेकांना धमकावण्या दिल्या. तथापि आर्य समाजामुळे मराठवाडयातील जनतेचे मनोधैर्य वाढले. इ.स. १९०२ मध्ये महात्मा स्वामी श्रध्दानंदजी, हैद्राबाद राज्यात आले, तेंव्हा सर्व समाजाचे चित्रच बदलले. त्यांनी विनायकरावजी विद्यालंकार यांना गुरुकुल कांगडी येथे शिक्षणासाठी नेले. मराठवाडयातील सुरूवातीचे बहुंताशी आर्य समाजी कार्यकर्ते गुरुकुल कांगडीचे विद्यार्थी आहेत. त्यावरून समाजाचा प्रभाव किती खोलवर रूजला होता हे स्पष्ट होते. पं.डी.आर. दास (उत्तममुनीजी वानप्रस्थी) यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीतून गुरुकुलात पाठवण्यात आलेल्या मराठवाडयातील काही विद्यार्थ्यांची नावे समजली ती सोबत देत आहे.

गुरुकुल कांगडीचे विद्यार्थी

१) श्री. वेदकुमार वेदालंकार, धाराशिव
२) डॉ. बिपीनचंद्र चामले, लातूर
३) श्री. मुदेव व्यंकटराव पाटील, लातूर
४) डॉ. चंद्रभानू सोनवणे, औरंगाबाद
५) श्री. रामचंद्र शंकरराव पाटील, अहमदपूर
६) डॉ.भगतसिंग राजूरकर, देगलूर
७) डॉ. बाळकृष्ण माने, कडेपूर (लातूर)
८) डॉ. हरिशंकर शर्मा, देगलूर
९) डॉ. धर्मवीर, सध्या अजमेर येथे रहातात.
१०) डॉ. मनोहर निवृत्तीराव रेड्डी, अहमदपूर
११) श्री. कृष्णराव देशमुख, अहमदपूर
१२) श्री. धर्मदिप रुकमे, मु.पो. कव्हा (लातूर)
१३) श्री. नरसिंगराव देशमुख, खटोला (लातूर)
१४) श्री. धर्मव्रत विद्यालंकार, हिंगोली
१५) श्री. ओमप्रकाश विद्यालंकार, हिंगोली
१६) श्री. ओमप्रकाश अग्रवाल, जालना
१७) श्री. भास्करराव होळीकर, लातुर
१८) श्री. ओमप्रकाश होळीकर, लातूर
१९) श्री. विजयकुमार शिंदे, लातूर .
२०) श्री. गोविंदराव गिरवलकर, परळी वैजनाथ

गुरुकुल, ज्वालापूर (हरीद्वार)

या गुरुकुलाचे संस्थापक स्वामी दर्शनानंदजी होते.

१) श्री. हरीश्चंद्र धर्माधिकारी, लातूर

२) श्री. नरदेव गुंडे, लातूर

३) श्री. सुभाष कंधारकर, नांदेड

४) श्री. सत्यकाम पाठक, नांदेड

५) आचार्य ब्रम्हदत्त पाठक, नांदेड

६) श्री. कुशलदेवजी शास्त्री, नांदेड

७) श्री. चंद्रशेखर लोखंडे, रेणापूर

याशिवाय डॉ. सत्यव्रत चंद्रदेव कवडे हे गुरुकुल झाज्जरचे विद्यार्थी होते.

मराठवाड्यातील गुरुकुलात समावेश असलेल्या महिलांची नावे पुढील प्रमाणे :

१) श्रीमती गायत्रीदेवी चामले, लातूर - कन्या गुरुकुल, हाचरस

२) ,, कमलाबाई पराडिकर, लातूर - ,,

३) ,, सुभद्रादेवी दिगंबरराव होळीकर, उदगीर - कन्या गुरुकुल,हाचरस

४) ,, सुशिलादेवी होळीकर, लातूर, -,,-

५) ,, प्रतिभादेवी वेदालंकार, धाराशिव - कन्या गुरुकुल, बडोदा (२ वर्षे)

६) ,, सरस्वती रेणापूरकर, रेणापूर -,,-

७) ,, चंद्रकला रेड्डी, अहमदपूर -,,-

८) ,, मीराबाई चंद्रभानू सोनवणे, कन्या गुरुकुल, डेहराडून

९) ,, सुशिला भानुदास कदाडे, अंबाजोगाई, कन्या गुरुकुल, बडोदा.[१२]

अनेक आर्य समाजी स्नातक व स्नातिका यांनी विविध गुरूकुलामधून वेदालंकार, विद्यालंकार, विद्याभास्कर, विद्यावाचस्पती, आयुर्वेदालंकार अशा अनेक पदव्या संपादन केल्या.

<u>ग्राम प्रचार योजना</u> :

` दि. २७-४-१९४० मध्ये आर्य प्रतिनिधी सभेच्या अंतरंग सभेत श्री. गणपतरावजी कथले यांनी ग्राम प्रचार योजनेचा प्रस्ताव मांडला. त्यामध्ये पाठशाळा उघडणे अथवा आर्य समाजी साहित्याच्या माध्यमातून प्रचार करणे अशी योजना होती. आर्य प्रतिनिधी सभेने ही योजना स्वीकारून त्याचा कार्यभार स्वत:वर घेतला. त्यानुसार १२८ खेडयामध्ये प्रचार कार्य सुरू करण्यात आले. त्यामध्ये कन्या शाळा चालवल्या जात होत्या. त्यामध्ये १०० विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. याशिवाय १३ पाठशाळा व ३८ रात्रीच्या पाठशाळा चालवल्या जात होत्या. त्यामध्ये सहा पगारी उपदेशक व ६२ बिनपगारी अध्यापक उपदेशक काम करीत होते. श्री. गणपतरावजी कथले, कळंब, जि. धाराशिव यानी ही योजना राबवली. हीलाच ` ग्राम प्रचार योजना ` कळंब म्हणून ओळखले जाते.`[१३] आर्य समाजाच्या मराठवाडयातील शैक्षणिक प्रचार व प्रसार कार्यात या योजनेचा फार मोठा वाटा होता.

<u>आर्य कन्या शाळा</u> :

आर्य समाजाच्या कार्यामुळे मराठवाडयातील स्त्रीयांचे मनोधैर्य वाढले, आणि समाजात नैतिकता आणि राष्ट्रीयत्व वाढीस लागले. स्त्रियांसाठी खास कन्याशाळा सुरू केल्यामुळे अनेक स्त्रीयांच्या शिक्षणाची सोय झाली. त्याशिवाय ठिकठिकाणी ` आर्य कन्या पाठशाळा ` उघडल्यामुळे स्त्री शिक्षणाचा प्रचार वाढू लागला. लातूर आर्य समाजाने स्त्री शिक्षणाच्या कार्यात फार मोठया

हिरीरीने भाग घेतला होता. इ.स. १९३५ मध्ये सौ. सुशिलाबाई दिवाण यांनी महिला विद्यामंदिराची स्थापना केली. त्यामध्ये प्रवेश घेणाऱ्या महिला आर्य समाजी होत्या.[१४] आर्य समाज, नांदेडच्या वतीनेही कन्या पाठशाळा चालवण्यात येत होती. आर्य समाजाने तत्कालीन निजाम राज्यात एवढे निर्बन्ध असतानाही स्त्री शिक्षणाच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी कन्याशाळांची उभारणी करून समाजाच्या वतीने महिलांच्यामध्ये आर्य समाज, वैदिक संस्कृती व धर्म याबाबत जागृती निर्माण करण्याचा फार मोठा प्रयत्न केला.

<u>वाचनालयांची स्थापना</u> :

आर्य समाजाने पाठशाळांच्या बरोबरच वैदिक धर्माच्या शिक्षणाचा प्रचार करण्यासाठी अनेक ठिकाणी वाचनालयाची स्थापना केली. आर्य समाजाने ठिकठिकाणी आपली मंदिरे कायम केली. ही आर्य समाज मंदिरे धार्मिक कृत्यांच्या बरोबरीने वाचनालये काढणे, साक्षरतेचे वर्ग घेणे इ. अनेक उपक्रम हाती घेत असत. मराठवाड्यात विशेषत: उस्मानाबाद व तेव्हाच्या बिदर जिल्ह्यात आर्य समाजाच्यावतीने वाचनालये व व्यायामशाळाही चालू करण्यात आल्या. या शिवाय उस्मानाबाद शहरातील नगर वाचनालयाची स्थापनाही आर्य समाजानेच केली होती. मराठवाड्यातील सर्वात जुने व पहिले वाचनालय परभणीचे गणेश वाचनालय आहे. त्याची स्थापना इ.स.१९०१ मध्ये झाली. गणेशोत्सवाच्या काळात या वाचनालयाची स्थापना झाल्यामुळे त्याचे नाव गणेश वाचनालय ठेवण्यात आले. गणेशोत्सवाचा भाग म्हणून आणखी इतरही वाचनालये होती. परभणीच्या गणेश वाचनालयाच्या स्थापनेशीही आर्य समाजाचा संबंध होता.[१५] याशिवाय मराठवाड्यात अन्य ठिकाणी बरीचशी वाचनालये उघडण्यात आली. अशा वाचनालयामधील ग्रंथ व वृत्तपत्रांद्वारे लोकजागृती होऊन लोकांना शिक्षण मिळू लागले. श्री.पं. माधवरावजी यांनी पानगांव येथे इ.स. १९४३ मध्ये एक तरूण वाचनालय सुरू केले. मराठवाड्यात वाचनालये स्थापन करण्याच्या कार्यात आर्य समाजाचा सिंहाचा वाटा होता. म्हणूनच निजामशाहीच्या निरंकुश सत्तेविरूध्द लढा उभा करण्याच्या कार्यात अशा संस्थांनी महत्वपूर्ण कार्य केले.

<u>खाजगी विद्यालयांची उभारणी</u> :

हैद्राबाद राज्यामध्ये आर्य समाजाचावतीने अनेक खाजगी विद्यालयांची स्थापना करण्यात आली होती. त्यामध्ये केशव स्मारक विद्यालय, हैद्राबाद, नूतन विद्यालय, उमरी, माणिक आर्य विद्यालय, हिंगोली, नरेंद्र विद्यालय, आपसिंगा, श्यामलाल स्मारक विद्यालय, उदगीर इ.चा समावेश होता. परंतु निजाम सरकारने अशा खाजगी शाळांवर प्रतिबंध लादले. मीर उस्मान अली खान (१९११-१९४८) याच्या काळात शैक्षणिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर बंधनाचे ओझे लादले गेले. संपूर्ण हैद्राबाद राज्यात चारशे पेक्षा जास्त खाजगी शाळा चालू होत्या. अशा शाळांच्यामुळे हिंदू धर्माचा प्रसार व प्रचार होईल, तसेच राज्यात त्यांना पोषक वातावरण तयार होईल म्हणून शासनकर्त्यांनी अशा शाळा बंद पाडण्यासाठी खालील नियमांची तरतूद केली.

१) सरकारच्या परवानगीशिवाय भविष्यकाळात खाजगी पाठशाळा स्थापन करू नयेत.
२) जर एखादी व्यक्ती अशी आज्ञा प्रसारीत अथवा जाहीर झाल्यानंतर शाळा उघडणार असेल आणि त्यांनी परवानगी घेतली नाही तर, शिक्षण विभागाचे संचालक, विभागीय इन्स्पेक्टर, तहसिलदार अथवा पोलिस कमिशनर त्या शाळा बंद करतील.
३) हुकूम देणारे अधिकारी नव्या शाळांना परवानगी देणे थांबवू शकतील अथवा जुन्या शाळा बंदही करू शकतील.[१६]

वरील शासकीय आदेशामुळे निजाम राज्यातील तीनशेपेक्षा अधिक खाजगी शाळा बंद पडल्या. यावरून निजाम सरकारचे खाजगी शाळांबाबतचे आडमुठे धोरण स्पष्ट दिसून येते. अनेक मागासवर्गीय शाळांमधील विद्यार्थ्यांस मुसलमान बनवण्याचे धोरण शासनकर्त्यांनी अवलंबले होते. याबाबत करीमनगर शिक्षण विभागाचे सुपरिटेंडेंट मुस्ताक महंमद याने शिक्षकांच्या नाजरना (प्रमुख) दिनांक ६-६-१३४६

फसली पत्र क्र. १०३-२ पाठवलेल्या पत्रावरून दुजोरा मिळतो. त्यामध्ये ते लिहितात, " अछूत पाठशालाके आधे से अधिक विद्यार्थी मुसलमान बन गये है, इसलिये आवश्यक है कि उन्हे मजहबी तालीम दी जाय। उन्हें किसी मुसलमान अध्यापक का नाम बता दिया जाय जो इस कार्य के लिये चन्द्रका (एक हिंदू अध्यापक) के स्थान पर रखा जाय।" इस पर शिक्षा विभाग के सुपरिंटेंडेंट ने लिखा कि अब मुसलमान होने पर इनसे फीस न ली जावे। "१७ अशा संघर्षमय काळात सुध्दा आर्य समाजाने मोठया धैर्याने आपली खासगी विद्यालये चालूच ठेवली. आर्य समाजाने मराठवाडयातील लोकांच्या मनात निर्माण झालेले मानसिक दौर्बल्य दूर करून त्यांच्यात ज्ञानाचा प्रकाश आणि नवचैतन्याची भावना निर्माण केली. यामुळे सरकारची वक्रदृष्टी होऊन आर्य समाजवाद्यांवर अत्याचारास प्रारंभ झाला. अहमदपूर व चाकूर येथील आर्य समाजाच्या पाठशाळा बंद करण्यात आल्या. त्यामुळे न भीता पुन्हा निर्धाराने सरकारशी संघर्ष सुरू करण्याचे आर्य समाजी लोकांनी ठरवले. इ.स. १९४३ मध्ये निजामाबाद (मूळ नाव इंदैार) येथे झालेल्या आर्य समाजाच्या संमेलनात अधिकाधिक पाठशाळा उघडण्याचा निर्णय घेण्यात आला.

आर्य समाजाच्या हैद्राबाद राज्यामधील शैक्षणिक संस्थात श्यामार्य गुरुकुल, राजुरा, गुरुकुल घटकेश्वर, गुरुकुल धारूर, गुरुकुल बेगमपेठ, कन्या पाठशाळा देवी आश्रम, बेगमपेठ, कन्या पाठशाळा, देवी दान बाग, सुलतान बाजार, सावित्री पाठशाळा, फिशनर्जंग, हैद्राबाद, श्यामलाल स्मारक विद्यालय, उदगीर, दयानंद विद्यालय, हैद्राबाद, माणिक विद्यालय, हिंगोली, नूतन विद्यालय, उमरी, नरेंद्र विद्यालय, आपसिंगा, रामचंद्र पाठशाळा, कोल्तागुडा इ. संस्थांचा येथे नामनिर्देश करता येतो. इ.स. १९४० पर्यन्त हैद्राबाद राज्यात आर्य समाजाच्या शैक्षणिक संस्थांची संख्या दोनशेपेक्षा अधिक होती आणि नंतरच्या काळात त्यामध्ये वाढच होत गेली.

आर्य प्रतिनिधी सभेने आपल्या रचनात्मक कार्यामध्ये शिक्षण प्रसाराला महत्व दिले होते. मुलांना हिंदी माध्यमातून शिक्षण देणे, तसेच शिक्षणाच्या

माध्यमातून वैदिक धर्माचा प्रचार करणे ही सभेची उद्दिष्टे बनली. आर्य समाजाच्या वतीने पाठशाळांमधून मुलामुलींच्या बरोबरच प्रौढांनाही शिक्षण दिले जात होते. हिंदी हेच शिक्षणाचे माध्यम झाले. आर्य समाजाच्या अत्यंत जुन्या शैक्षणिक संस्थामध्ये देविदान बागेमधील कन्या शाळा, इ.स. १९०० मधील हलीखेड येथील श्री. बंसीलाल व श्री. श्यामलाल यांनी चालवलेली हिंदी पाठशाळा, किल्ले धारूर येथील गुरूकुल, श्री. मोहनलाल बलदवा यांनी सुरू केलेली पाठशाळा आणि कन्या गुरूकुल वैदिकाश्रम, बेगम पेठ इ. संस्थांचा समावेश होतो. वरील संस्थांमधून हिंदीच्या प्रचाराचे महत्वाचे कार्य करण्यात आले. निजामाच्या सक्तीच्या उर्दू माध्यमाच्या धोरणा विरूध्द आर्य समाजाने हिंदीच्या माध्यमातून हिंदूंच्या मनात फार मोठी जागृती निर्माण केली. त्यामुळे हैद्राबाद राज्यात हिंदी माध्यमातील साहित्य लोकांना वाचावयास मिळू लागले. परिणामत: अनेक विद्यार्थी आर्यकुमार परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या हिंदी परीक्षेस बसत असत. इतकेच नव्हे तर अनेक विद्यार्थी अजमेर येथे जाऊन हिंदी भाषेच्या परीक्षा देत असत. आर्य समाजाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या प्रत्येक संस्थेमधून हिंदी भाषेचे शिक्षण दिले जात होते. म्हणून हिंदी ही आर्य समाजाची प्रचाराची व प्रसाराची भाषा होती. आजही अनेक आर्य समाजी कार्यकर्त्यांचा पत्रव्यवहार, तसेच समाजाच्या वतीने प्रकाशित होणारे साहित्य हिंदी भाषेत आहे.

आर्य समाजाच्या वतीने मराठवाड्यात शिक्षण प्रसाराचे कार्य खालील अनेक संस्थांच्या माध्यमातून करण्यात आले.

१) <u>दयानंद नि:शुल्क पाठशाळा</u> :

इ.स. १९३६ मध्ये आर्य समाज लातूरच्या वतीने ही पाठशाळा चालवली जात होती. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्याकडून कसलीही फी घेतली जात नव्हती. ही पाठशाळा चालवण्या पाठीमागे उद्देश असा होता की, अस्पृश्य मुलांना मोफत

शिक्षण मिळावे. ही पाठशाळा चालवण्यासाठी श्री. शंकरदेव अण्टूरे सिध्दांत यांनी फार मोठे परीश्रम घेतले. त्यांनी लातूर येथील प्रत्येक शनिवारच्या आठवडयाच्या बाजारामध्ये पाठशाळा चालवण्यासाठी पेटीद्वारे आर्थिक सहाय्य जमा केले त्यासाठी त्यांनी स्वत: हातात मदत पेटी घेऊन परीश्रमपूर्वक मदत जमा केली. दिवसें दिवस विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होऊ लागली तसा तेथील अध्यापक वर्गही वाढवण्यात आला. सर्वश्री अनंताचार्य काळ, श्री. प्रल्हादरावजी कुलकर्णी, श्री. वामनराव उजळंबकर, श्री. देवदत्तजी मोहिते, श्री. धनश्यामजी पांडे, श्री. रामरावजी गौरकर आणि श्री. भीमसेनजी चाकूरकर इ. चा अध्यापक म्हणून पाठशाळा चालवण्यामध्ये महत्वपूर्ण वाटा होता. परंतु इ.स. १९४४ मध्ये काही अपरिहार्य कारणामुळे ही पाठशाळा बंद पडली. आर्यप्रतिनिधी सभेने या पाठशाळेचा आर्थिक भार स्वत:वर घेण्याचे ठरवूनही लातूर आर्य समाजाने ही पाठशाळा बंद करण्याचा अत्यंत चुकीचा निर्णय घेतला. त्यामुळे अनेक हरिजन बालकांना शिक्षणापासून वंचीत राहावे लागले.[१८]

२) <u>वैदिक सेवाश्रम</u> :

आर्य समाज नांदेडचे प्रधान भाई खुशालसिंह वर्मा तथा श्री. जिंदमगी यानी इ.स. १९३८ मध्ये चितोड गुरुकुलाचे आर्य श्री. स्वामी ब्रह्मानंद यांच्याकडून वानप्रस्थ आश्रमाची दिक्षा घेतली. त्यांनी दीड लाख रूपये देणगी देऊन वैदिक सेवाश्रमाची एक विशाल वास्तू उभी केली. येथे अनाथलय चालवण्यात येऊ लागले. तेथेच वैदिक धर्माच्या शिक्षणाचे महत्वपूर्ण केंद्र उभा करण्यात आले. या वैदिक सेवाश्रमामध्ये ४० अनाथ विद्यार्थ्यांनी वैदिक धर्माच्या शिक्षणाचे धडे घेतले.[१९] आर्य समाज नांदेडच्या वतीने राबवण्यात आलेला हा एक शैक्षणिक उपक्रम अनाथ बालकांच्यासाठी उपयुक्त ठरला.

३) आर्य विद्यालय, हिंगोली :

आर्य समाजाच्या विद्यमाने आर्य विद्यालयाची हिंगोली (जि. परभणी) येथे इ.स. १९४० मध्ये स्थापना करण्यात आली. ही स्थापना हैद्राबाद राज्याच्या आर्य प्रतिनिधी सभेच्या आज्ञेनुसार करण्यात आली. त्यावेळी सभेचे प्रधान बॅरिस्टर विनायकरावजी विद्यालंकार हे होते. श्री. भद्रसेनजी राठोड, श्री. बाबुलाल राठोड तसेच श्री. सखारामजी डुब्बेवार अथवा स्त्री धर्मपालनी इ. अनेक आर्य समाजी कार्यकर्त्यांचा त्यामध्ये मोठा सहभाग होता. इ.स.१९४७ मध्ये जेंव्हा आर्य समाजी कार्यकर्त्यांच्या धरपकडीचे सत्र सुरू झाले. तेंव्हा काही काळ आर्य विद्यालयाचे काम मंदावले होते. मराठवाडयामध्ये आर्य समाजाच्या वतीने चालवण्यात येणारे हे एक महत्वपूर्ण शैक्षणिक केंद्र होते. आर्य समाजाच्या मंदिरामध्येच काही काळ हे विद्यालय चालू होते. हिंदी हे येथील शिक्षणाचे माध्यम होते. पं. नरेंद्रजी सक्सेना, आचार्य श्री. खंडेरावजी कुलकर्णी इ. कार्यकर्त्यांनी यासाठी बहुमोल सहकार्य दिले. इ.स. १९४० पासून इ.स. १९५३ पर्यन्त या विद्यालयास ` आर्य विद्यालय, हिंगोली ` या नावाने ओळखण्यात येत होते. परंतु इ.स. १९५३ मध्ये श्री. बाबुलाल राठोड, श्री. प्रेमचंद राठोड, श्री. भद्रसेन राठोड यानी आपले स्वर्गीय पिताजी माणिकचंदजी यांच्या स्मरणार्थ रू. ५०,०००-०० ची देणगी दिली. तेंव्हापासून आर्य विद्यालयाचे नामकरण करण्यात येऊन ` श्री. माणिक स्मारक आर्य विद्यालय ` असे ठेवण्यात आले.[२०] १९५६ च्या भाषावर प्रांत रचनेमुळे ही शाखा चालवण्या-बाबत आर्य प्रतिनिधी सभेपुढे बऱ्याचशा अडचणी येऊ लागल्या. तेंव्हा ` दयानंद शिक्षण संस्थेची ` स्थापना करून विद्यालयाचे कामकाज स्थानिक आर्य समाजाच्या वतीने पाहण्यात येऊ लागले. आज या शिक्षण संस्थेचा मोठया प्रमाणात विस्तार झाला आहे. आर्य विद्यालयाच्या स्थापनेमुळे मराठवाडयातील अनेक हिंदूना हिंदीतून शिक्षण मिळण्याची सोय झाली.

४) नूतन विद्यालय, उमरी :

परभणी जिल्हामध्येच आर्य समाजाने आपले दुसरे विद्यालय स्थापन केले. त्यामुळे निजाम राजवटीमध्ये आर्य समाजाच्या शैक्षणिक कार्यांत परभणी जिल्हा अग्रेसर होता असे म्हणावे लागते. इ.स. १९४१ मध्ये आर्य समाजाने नूतन विद्यालयाची स्थापना केली. इ.स. १९४१ पासून १९४९ पर्यन्त हे विद्यालय आर्य प्रतिनिधी सभेच्या सहकार्याने चालू होते. १९४८-४९ मध्ये नूतन विद्यालयात १०० विद्यार्थी होते व पाच शिक्षक काम करीत होते.[२१] आर्य प्रतिनिधी सभेने अनेक शैक्षणिक संस्थांची उभारणी करून शिक्षण प्रसाराच्या कार्यास चालना दिली. त्यासाठी आर्य प्रतिनिधी सभेस सार्वत्रिक आर्य प्रतिनिधी सभेने (इंटरनॅशनल आर्य लीग) फार मोठे सहकार्य केले. सत्याग्रहातील यशानंतर आर्य समाजाने शैक्षणिक क्षेत्रात जी प्रगती केली त्यामध्ये मराठवाडा आघाडीवर होता. अशा शैक्षणिक संस्थांच्या स्थापनेमुळेच आर्यसमाजाचा मराठवाड्यातील लोकमतावर मोठा प्रभाव पडला. या शिवाय समाजाने धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याच्या कार्याबरोबरच निजामाचा निरंकुश सत्तेखाली व उर्दूच्या कचाट्यात सापडलेल्या तरूणांना हिंदीच्या रूपाने ज्ञानाचा एक नवा मार्ग दाखविला.

वरील शैक्षणिक संस्थांच्या शिवाय आर्य प्रतिनिधी सभेने मराठवाड्यात भाई श्यामलालजींच्या स्मृती प्रित्यर्थ दि. १५ ऑगस्ट १९५० रोजी उदगीर येथे श्यामलाल स्मारक विद्यालय सुरू केले. तर पं. नरेंद्रजी सक्सेना, प्रधान, आर्य प्रतिनिधी सभा, यांच्या नावाने आयसिंगा, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद येथे नरेंद्र आर्य विद्यालय, स्थापन केले. सध्या हे विद्यालय आर्य समाजा ऐवजी स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहाय्याने चालवले जाते. श्री. साहेबराव ईंगरगेकर, कृष्णनाथराव जगताप, रामचंद्रराव भोसले तसेच मनोहर व्यंकटेश रोहिणीकर इ. कार्यकर्त्यांचा नरेंद्र आर्य विद्यालय, आपसिंगा स्थापनेत वाटा आहे. आर्य समाजाने शैक्षणिक कार्याचे लावलेले रोपटे हैद्राबाद मुक्ती संग्रामाच्या समाप्तीनंतरच्या काळात चांगलेच फोफावले.

<u>विद्यार्थी वसतिगृहे</u> :

आर्य समाजाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची उभारणीही करण्यात आली होती. वसतिगृहामध्ये मुलांचे चारित्र्य चांगले घडावे याकडे अधिक लक्ष दिले जात होते. विद्यार्थी वसतिगृह, उस्मानाबाद हे समाजाच्या वतीने चालवले जात होते. इ.स. १९४० मध्ये या वसतिगृहातील विद्यार्थ्यांची संख्या ३० होती. श्री. बापूरावजी जगदाळे मास्तर हे वसतिगृहाचे संचालक म्हणून काम करीत होते.[२२] वर्षानुवर्षे विद्यार्थी संख्येत वाढ होत होती. मराठवाड्यातील आर्य समाजाचे एक निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून श्री. बापूरावजी यांना ओळखण्यात येते. अशाच पध्दतीने समाजाच्या वतीने नांदेड येथे आर्य विद्यार्थी वसतिगृह चालवले जात होते. तेथे इ.स. १९४८-४९ मध्ये विद्यार्थी संख्या २८ होती. दोन विद्यार्थ्यांची मोफत राहण्याची सोय करण्यात आली होती. श्री शामलालजी राठोड, मंत्री, आर्य समाज, नांदेड यांनी या विद्यार्थी वसतिगृहाची स्थापना केली. २० जून, १९४९ मध्ये देगलूर (जि. नांदेड) येथे आर्यविद्यार्थी वसतिगृह उघडण्यात आले. सुरवातीला त्यामध्ये ३५ विद्यार्थी होते. श्री. नागनाथनी तम्मेवार हे याचे प्रधान व संचालक होते.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नती बरोबरच त्यांचा मानसिक व शारीरिक विकास साधावा याकडे लक्ष देऊन आर्य समाजाची विविध वसतिगृहे सुरू करण्यात आली होती. त्यामध्ये आर्य विद्यार्थी गृह, उस्मानाबाद, किसान विद्यार्थी वसतिगृह, उदगीर, किसान विद्यार्थी वसतिगृह, लातूर तसेच आर्य विद्यार्थी वसतिगृह, देगलूर इ. चा समावेश होता.

विद्यार्थी वसतिगृहामुळे आर्य समाजाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यास हातभार लागला. वसतिगृहामध्ये प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना वैदिक धर्माच्या शिकवणी बरोबरच, चारित्र्य संपन्नतेचे धडे दिले जात. वसतिगृहातील संस्कारांचा

उपयोग हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये व त्यानंतरही झाला. आर्य समाजाच्या विद्यार्थी वसतिगृहाच्या योजनेमुळे अनेक विद्यार्थ्यांना भावी काळातील संपन्न जीवनाची संधी उपलब्ध झाली.

हिंदी प्रचार कार्य :

महर्षि स्वामी दयानंद सरस्वती हे संस्कृतचे गाढे अभ्यासक होते. इतकेच नव्हे तर ते स्वत: अत्यंत मधुर व सरळ संस्कृत भाषा बोलत असत. पण तरीही आर्य समाजाच्या प्रचारासाठी संस्कृतपेक्षा हिंदी भाषेचा प्रयोग करण्याचे त्यांनी ठरवले. त्यानुसार पुढे तर हिंदीला ते ' आर्य भाषा ' म्हणून संबोधू लागले. ' सत्यार्थ प्रकाश ' हा ग्रंथ ' त्यांनी हिंदीमध्येच लिहिला. महर्षिंची ही प्रेरणा त्यांच्या सर्व अनुयायांनी घेतली. इतकेच नव्हे तर ही राष्ट्रभाषा व्हावी यावर समाजाने जोर दिला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात उत्तरेच्या प्रदेशात आर्य समाजाचा मोठया प्रमाणात प्रसार झाला. त्यामुळे हिंदी भाषेचा प्रचारही त्याच वेगाने झाला. दक्षिणेच्या अहिंदी भागात आर्य समाजाची स्थापना झाल्यानंतर येथेही हिंदीचा मोठया प्रमाणात प्रचार होऊ लागला. उत्तरेकडील प्रदेशातून आर्य समाजाचे जे उपदेशक हैद्राबाद राज्यात वैदिक धर्माचा प्रचार करण्यासाठी आले त्यांनी तर लोकांना हिंदी ही खरी ' आर्य भाषा ' आहे असे लोकांच्या मनावर बिंबवले. हैद्राबाद राज्यात निजाम सरकारने विशेषत: शेवटचा निजाम एच.ई.एच. दि मीर उस्मान अलीखान बहादूर याच्या काळात हिंदूच्यावर उर्दू भाषेची सक्ती करण्यात आली. आर्य उपदेशकांच्या सहाय्याने हिंदी भाषेचा राज्यात प्रचार होणे हे देखील निजाम सरकारला रुचले नाही.

आर्य समाजाने शिक्षणासाठी हिंदी माध्यम सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला. पण हा त्यांचा प्रयत्न इ.स. १९४८ पर्यन्त यशस्वी होऊ शकला नाही. तथापि आर्य समाजाने हिंदी प्रचार कार्यात फार मोठी कामगिरी केली आहे. याबाबतचे एक बोलके पत्र आर्य समाजाचे एक प्रमुख कार्यकर्ते पं. कृष्णदत्तजी (नलाकुंटा-

हैद्राबाद) यानी दि. २७ ऑगस्ट, १९८७ रोजी मला लिहिले आहे ते म्हणतात,
" विगत हैद्राबात राज्य (निजाम स्टेट) के सभी जिलों में आर्य समाज की शाखाएँ थी। इन समाजों में प्रति सप्ताह साप्ताहित अधिवेशने होते थे। श्रावण मास में वेद सप्ताह होता था। लगभग सभी समाजों के वार्षिक उत्सव होते थे। इनमें जो भाषण और भजन होते थे, वे सब हिंदी में होते थे। शायद किसी एकाध समाज में मराठी, कन्नड, और तेलगु में भाषण होते थे। सामान्य रूपसे हिन्दी का प्रयोग ही होता था। इसके तीन कारण थे (१) राज्यमें प्रारंभीक कालमें आर्य समाज के प्रचार के चार प्रमुख व्यक्ती थे। भाई बंसीलाल, भाई शामलाल, पं. नरेंद्र, केशवराव कोरटकर और उनके पुत्र विनायकराव विधालंकार। ये सभी प्रचार कार्य में हिन्दी का प्रयोग करते थे।...(२) निजाम राज्य में प्रशासन और शिक्षा का माध्यम उर्दू भाषाथा जो हिन्दी से बहुत मेल खाती है। अत: हिंदी में होनेवाले भाषणों को सामान्य तथा अशिक्षित जनता भी अच्छी तरह समझ लेती थी। और हिंदू के मुकाबले में हिंदू जनता सार्वजनिक जीवन में हिन्दी का प्रयोग अधिक उत्साह से करती थी। (३) इस समय निजाम शासन काल में आर्य समाज प्रचार के लिये वार्षिकोत्सव और श्रावण के वेद सप्ताहों के लिए उत्तर से आर्य समाजी विद्वानों, पंडीतों और प्रचारकों का स्थायी और अस्थायी रूपसे बुलाया जाता था। उनके भाषण हिंदी मे होते थे। आर्य समाजके वार्षिकोत्सव में तो हजारों की संख्या मे जनता इकठ्ठी होती थी। इस कारण निजाम राज्यांतर्गत छोटे बडे सभी स्थानोंकी अखबार उर्दू में भी छपते थे, जैसे आर्य गॅझट, आर्य वीर, आर्य मुसाफिर। इनकी लि पी तो उर्दू होती थी, किंतु भाषा हिंदी रहती थी। इस क्षेत्र में आर्य समाज के कारण हिंदी का प्रचार होता रहा।.... हजारो स्त्री पुरूषोमें हिंदी लिखने, पढने और बोलने की परिपाटि चल पडी। "[23]

आर्य समाजाच्या हिंदी प्रचार कार्याचा प्रभाव मराठवाड्यातही उमटला असणे स्वाभाविकच आहे. आर्य समाजाने जेथे जेथे वार्षिकोत्सव साजरे केले तेथे प्रचारकांनी हिंदीमध्येच कार्य केले. आर्य समाजाने हैद्राबाद राज्यात हिंदी भाषेच्या प्रचाराने राष्ट्रीय जागृती घडवून आणली.

उपदेशक विद्यालय :

आर्य समाजाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या उपदेशक विद्यालयातून अनेक प्रचारक प्रशिक्षण घेऊन बाहेर पडत व हे लोक संस्थानात आर्य समाजाचा प्रचार करीत असत. २५ जुलै, १९३८ रोजी सर्वप्रथम उपदेशक विद्यालय, आर्य समाज, सुलतान बाजार येथे उघडण्यात आले. त्याची सर्व जबाबदारी हैद्राबादचे लोह पुरूष पं. नरेंद्रजी यांच्यावर सोपवण्यात आली होती. तसेच विद्यालयात शिक्षण देण्यासाठी पं. लक्ष्मीशंकर शास्त्री आणि पं. राजाराम शास्त्री यांची नेमणूक करण्यात आली होती. येथे १० विद्यार्थ्यांनी सिध्दांत प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला होता. परंतु सरकारकडून या उपदेशक विद्यालयाच्या स्थापनेत अडथळे निर्माण होऊ लागले. इतकेच नव्हे तर हे विद्यालय बंद करण्यात यावे असा आदेश देण्यात आला. अखेर हे उपदेशक विद्यालय बंद करण्यात आले.[२४] इ.स. १९४४ पर्यन्त हैद्राबाद संस्थानात प्रचारकांची संख्या तीनशेच्या वर पोहोचली. इ.स. १९४५ मध्ये नालगोंडा येथे उपदेशक विद्यालय सुरू करण्यात आले. या विद्यालयातून आर्य समाजाचे प्रचारक प्रशिक्षण घेऊन बाहेर पडत. पं. नरदेवजी स्नेही (धारूर, जि.बीड) हे आर्य समाजी कार्यकर्ते, उपदेशक विद्यालय, हरिद्वार येथून दीक्षा घेऊन बाहेर पडले.

संस्थानामधील आर्य उपदेशक विद्यालयावरील बंदीमुळे सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, मुख्य कार्यालय, दिल्ली यांनी नोव्हेंबर १९३९ च्या सुरूवातीस सोलापूर येथे उपदेशक विद्यालय उघडले. बाहेरून येणारे आर्य समाजाचे प्रचारक तेथे प्रशिक्षण घेऊ लागले.[२५] सोलापूर येथील उपदेशक विद्यालयामध्ये पं.ज्ञानेंद्र

शर्मा, औरंगाबाद, पंडीत विरभद्रजी (साकोल, जि. बिदर सध्या जि. लातूर) भास्कर रामचंद्र ममदापूरकर (ममदापूर, जि. बिदर सध्या जि. लातूर) इ.नी एक वर्ष प्रशिक्षण घेतले. या विद्यालयात हिंदी भाषा व वैदिक धर्म इ. चे शिक्षण दिले जात असे.[२६]

पुढे १ जून १९४० मध्ये सोलापूर येथे दयानंद अँग्लो वैदिक कॉलेजची स्थापना झाली. सोलापूर येथील आर्य समाजाने हैद्राबाद संस्थानातील प्रत्येक कार्यास मोठया प्रमाणात प्रतिसाद देऊन मदत केली. आर्य समाजाचे अनेक उपदेशक हैद्राबाद राज्यात प्रवेश करीत असताना सोलापूर येथूनच पुढे येत असत. अनेक उपदेशकांना तयार करण्यासाठी चैत्र शक्ल १ संवत २००१ च्या म्हणजेच २५ मार्च, १९४४ च्या अतरंग सभेच्या बैठकीमध्ये उपदेशक विद्यालये स्थापन करण्याबाबत निश्चिती झाली. तेथे कमीत कमी १० विद्यार्थ्यांची राहण्याची, शिक्षणाची सर्व ती व्यवस्था व्हावी असे ठरवण्यात आले. अशा विद्यालयांना श्री. व्यंकट स्वामी वकील यांनी एक वर्षासाठी १२० रूपये देण्याचे वचन दिले.[२७] आर्योपदेशक विद्यालयाचे आचार्य श्री. ऋभुदेवजी यांना इ.स. १९४८ मध्ये निजाम सरकारने तीन वर्षासाठी राज्याबाहेर जाण्याचा आदेश दिला. तेव्हा मात्र उपदेशक विद्यालय बंदच ठेवण्यात आले. इ.स. १९३१ ते १९४० या काळातील दशवार्षिक कार्य विवरणावरून आर्य प्रतिनिधी सभेचे एकूण ४४ उपदेशक होते. याशिवाय कळंब (जि. धाराशिव) योजनेत १० उपदेशक, १४ अध्यापक, ७ अध्यापिका इ. कार्य करीत होत्या असे दिसून येते.[२८]

आर्य प्रतिनिधी सभेने आर्य समाजाचा प्रचार करण्यासाठी उपदेशक विद्यालयाची स्थापना केली होती. त्यानुसार प्रचारकांना प्रशिक्षण देऊन धार्मिक शिक्षणाचा प्रचार करून आर्य समाजामध्ये व हिंदूमध्ये नवचैतन्याची भावना निर्माण करणे हा त्याचा मुख्य हेतू होता.

मराठवाड्यात आर्य समाजाच्या वतीने खाजगी पाठशाळा चालवल्या जात होत्या याशिवाय अनेक आर्य समाजामध्ये प्रौढ शिक्षणाचे व साक्षरता प्रसाराचे कार्य केले जात होते. गुंजोटी (पायगा) येथील श्रीकृष्ण विद्यालय हेही समाजाच्यावतीने चालवले जात होते. इ.स. १९४१ मध्ये अहमदपूर तालुक्यातील चाकूर येथे आर्य समाजाने एक पाठशाळा काढली. परंतु दस-याच्या दिवशी काढलेल्या यात्रेचा आरोप चाकूरच्या आर्य समाजावर ठेऊन ती पाठशाळा बंद करण्यात आली. मराठवाड्यात हे दुर्भाग्य अनेक पाठशाळांच्या वाटयाला आले. उस्मानाबाद येथील आर्य समाजाचे कार्यकर्ते श्री. बापूराव जगदाळे मास्तर हे आर्य समाजाच्या वतीने साक्षरतेचे वर्ग चालवत होते. हैद्राबाद राज्यात मराठवाड्यातील आर्य समाजाने इ.स. १९३० पूर्वी स्थानिक पातळीवर व १९३० नंतर संघटनात्मक पातळीवर शैक्षणिक क्षेत्रात धार्मिक शिक्षण प्रचार व राष्ट्रभाषा प्रचाराचे कार्य केले.

<u>वृत्तपत्रे आणि प्रकाशित साहित्य</u> :

वृत्तपत्रे व प्रकाशित साहित्य चार भींतींच्या आत दिल्या जाणा-या शिक्षणाच्या प्रसारास उपयोगी पडत नाहीत. तथापि लोकजागृती व समाज प्रबोधन याबाबतीत वृत्तपत्रे व साहित्य मौलिक भूमिका बजावतात. त्याला संस्कार-मूल्य असल्यामुळे समाज मनाच्या जडणघडणीत त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आर्य समाजामार्फत हैद्राबाद संस्थानात निघणारी वृत्तपत्रे व प्रकाशित झालेले साहित्य याने मराठवाड्यातील शिक्षण प्रसाराच्या कार्यास कसा हातभार लावला याची येथे चर्चा करणे अगत्याचे आहे.

हैद्राबाद राज्यात आर्य समाजाच्या स्थापनेपूर्वी निजामाच्या वर्चस्वा-खाली असणा-या व निजाम सरकारला अनुकूल असणा-या वृत्तपत्रांचाच प्रामुख्याने भरणा होता. सत्याचा प्रचार करणारी वृत्तपत्रे आपल्या इलाख्यात काढून

द्यावयाची नाहीत असेसरकारी धोरण होते. जी काही वृत्तपत्रे संस्थानात होती ती एक तर राजनिष्ठ अथवा धंदेवाईक दृष्टीकोनातून चालणारी होती. संस्थानाबाहेर निघणारी वृत्तपत्रे संस्थानात प्रसृत होण्यापूर्वी त्यांची कसून तपासणी होत असे. ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ असणाऱ्या पत्रांना मात्र संस्थानात प्रोत्साहन मिळत असे. तर राष्ट्रीय बाण्याची वृत्तपत्रे मग ती कोणत्याही भाषेतील असोत सरकारी रोषास पात्र ठरत. संस्थानात वृत्तपत्रे सुरू करणारास भयंकर दिव्यातून जावे लागे. एखाद्या पत्रास परवानगी मिळालीच तर ती टिकविण्यासाठी संपादकांना तारेवरची कसरत करावी लागे. १९२० साली सुरू झालेले ' निजाम विजय ' साप्ताहिक अशा कसरतीवरच शेवटपर्यन्त टिकले. ' नागरिक ' या मराठी पत्राला दोन वर्षांच्या आत (१९२९-३१) आपला गाशा गुंडाळावा लागला. हे वृत्तपत्र औरंगाबाद मधून प्रकाशित होत असे. श्री. केशवराव कोरटकर या आर्य समाजी कार्यकर्त्यांची या वृत्तपत्रासाठी दरमहा २०० रूपयांची मदत होती. ' मुशीरेदख्खन ' हे उर्दू पत्र काढणाऱ्या औरंगाबादकरानी ' नागरीक ' हे वृत्तपत्र काढले होते. हैद्राबादचे दिवाण तर मिर्झा इस्माईल (१९४६) फक्त दहा महिने दिवाण पदावर होते. त्यांच्या पुरोगामी धोरणाचा अनेकांना लाभ झाला. पण हे त्यांचे धोरण जास्त काळ टिकू शकले नाही. किंबहुना त्यांना राजिनामा देणे भाग पाडले.

हैद्राबाद संस्थानामधील मराठी भाषिकांचा मराठवाडा विभाग ग्रामीण व मागास होता. इ.स. १८९६ मध्ये प्रकाशित झालेले ' औरंगाबाद समाचार ' हे मराठी-उर्दू वृत्तपत्र मराठवाड्यातील वृत्तपत्रांची गंगोत्री होती. १९ व्या शतकाच्या अंतिम दशकात महाराष्ट्रात लो. टिळक युगात राजकीय जागृतीची लाट संचारत होती. तर मराठवाड्यात निजामाच्या अन्यायी राजवटीचा वरवंटा फिरत होता. या काळातील वृत्तपत्रांचे स्वरूप द्विभाषिक असले तरी त्यास प्रखर राजकीय दृष्टीची जाणीव नव्हती. आ.कृ. वाघमारे यांनी १० फेब्रुवारी १९३८ ला ' मराठवाडा ' चा प्रथमांक प्रसिद्ध केला. पण हळूहळू सरकारने त्यावर बंदी घातली. हे वृत्तपत्र

पुण्याहून प्रकाशित होऊ लागले. ` मराठवाडा ` प्रमाणेच नागरीक, संग्राम, रणदुंदुभी, समरभूमी, हैद्राबाज स्वराज्य, मोगलाई, कायदेभंग, सत्याग्रह व कायाकल्प इ. वृत्तपत्रानाही सरकारी रोषास बळी पडावे लागले. हैद्राबामधून वासुदेवराव औरंगाबादकर हे मराठी भाषिक गृहस्थ ` मुशीरे दख्खन ` हे उर्दू नियतकालिक काढीत असत.

देशातील काही प्रमुख वृत्तपत्रांना संस्थानामध्ये येण्यास बंदी घातली होती. त्यामध्ये मद्रासहून प्रकाशित होणारे `हिंदू,` लाहोरचे ` सर्व्हंटस् ऑफ ईंडिया सोसायटी ` व मुंबईचे ` बॉम्बे क्रोनिकल ` या वृत्तपत्रांचा समावेश होता. तर अनेक मोठया वृत्तपत्रांना त्यानी सरकारच्या विरूध्द कसलेही लिखाण प्रसिध्द करू नये यासाठी निजाम सरकारकडून पैसा पुरवला जात असे. ` रहबरे दख्खन ` हे वृत्तपत्र सरकार धार्जिणे व हिंदू विरोधी होते. या वृत्तपत्रामधून प्रसिध्द होणारे लिखाण पूर्णपणे हिंदूंच्या विरूध्द असे. सरकारी धोरणाला पाठिंबा देणाऱ्या वृत्तपत्रात ` सुभे दख्खन,`` निजाम गॅझेट,`` रहेबार-इ-दख्खन,`` वक्त, ` निजन,`` पैसा,`` अक्बर सहिफा` इ.चा समावेश होता. हैद्राबाद संस्थानामधील व संस्थाना बाहेरील काही वृत्तपत्रांनी वारंवार निजामाच्या धोरणावर ताशेरे ओढले. वृत्तपत्रांबाबत निजाम सरकारचे धोरण अनुदार होते. ` दि केस ऑफ दि आर्य समाज इन हैद्राबाद ` नावाच्या पुस्तकामध्ये सरकारी धोरण हिंदूंच्या वृत्तपत्र व प्रकाशित साहित्यास कसे मारक तर निजामाना ते कसे अनुकूल होतो याचा आढावा घेण्यात आला आहे. त्यानुसार ` रहेबार-ए-दख्खन,` ` सुभे दख्खन,`` सहिफा` व ` वक्त ` ही दैनिके,` खलिफ ` हे साप्ताहिक आणि निजाम सरकारच्या धार्मिक विभागाकडून प्रकाशित होणारे ` वाइज ` हे मासिक हे हिंदू विरोधी व मुसलमानाना अनुकूल होते.[२९]

निजामी राज्यात या वृत्तपत्रांना व नियतकालिकांना स्थान होते पण हिंदू साहित्यास मात्र बंदी घालण्यात आली होती. बंदी घालण्यात आलेल्या हिंदू साहित्यात खालील मराठी, उर्दू, हिंदी, ग्रंथाचा समावेश होता. त्यामधील काही साहित्य येथे नमूद करीत आहे.

१) दर्शनानंद ग्रंथमाला

२) गंगा प्रसाद उपाध्यायकृत ` औरत की लूट `

३) हिंदू धर्म का नाश

४) इस्लाम से प्रश्न

५) कुराण मे तजीले वेद - पं. नरेंद्र

६) हिजात-ए-इस्लाम - लेखारामजी

७) रंगीला गझारा - रंगीलाल गौर

८) नळदमयंती

९) दुर्गा

१०) स्वामी श्रध्दानंद.

११) हिंदू जागो

१२) महाराणा प्रताप

१३) शिवाजी का पोवाडा[३०]

तर खून के आँसू, कुफरा तौर, दाये इस्लाम आणि हसन निजामीचे मुरक्की कासिम व सिद्दीक दिनदारचे सरवारे आलम यासारख्या मुस्लीम साहित्याच्या द्वारे आर्य समाज व पर्यायाने हिंदू समाज यांच्याबद्दल द्वेष फैलावण्यात येत होता.[३१]

तसेच निजाम सरकार अनेक वृत्तपत्रे व संस्थांना देणगी देऊन त्यांच्या-मार्फत हिंदूंच्या विरूध्द भावना चेतावण्यास मदत करत होते. त्यामध्ये खालील वृत्तपत्रे व संस्थांचा समावेश आहे. त्यांच्या नावापुढे त्याना निजामाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्याचे आकडे दिले आहेत.

१) मुस्लीम - रू. १,८३४-०० वार्षिक

२) पैसा - रू. ३,३३४-०० वार्षिक

३) अंजुमन तारीखे (उर्दू वृत्तपत्र) - रू. २,८००-०० वार्षिक

४) मोईदुल इस्लाम - रू. ४००-०० वार्षिक.[३२]

वरील उदाहरणावरून हे स्पष्ट दिसून येते की, निजामाचे सरकार हे पूर्णपणे इस्लामीकरणाच्या मार्गांचा अवलंब करीत होते. परिणामत: आर्य समाजाच्या व हिंदूंच्या साहित्य प्रसारावर निर्बन्धामुळे हिंदू लोक त्रस्त होऊ लागले. त्यांना आपल्या संस्कृतीचा अभ्यास करणेही अवघड होऊन बसले होते.

निजामांनी आपल्या राज्यातून हिंदू संस्कृती नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. त्यानुसार त्यांनी आपल्या राज्यातील काही गावांची मूळची हिंदू नावे बदलून त्याना मुस्लमी नावे बहाल केली. उदाहरणार्थ -

| हिंदु नाव | मुस्लीम नाव |
|---|---|
| १) चित्रगुप्त | मोईनाबाद |
| २) धारूर | फतेहाबाद |
| ३) धाराशिव | उस्मानाबाद |
| ४) तांडूर | बशीराबाद |
| ५) अंबाजोगाई | मोमीनाबाद |

वरील सर्वच ठिकाणे मराठवाडयातील आहेत. निजामांचे धोरण हिंदूंना प्रतिकूल असल्यामुळे निजामी सरकारला विरोध करणारी हिंदूंची वृत्तपत्रे आणि साहित्य यांची हैद्राबाद राज्यात किती बिकट परिस्थिती असेल याची कल्पना करता येते.

ब्रिटिश हिंदुस्थानातून आर्य समाजाची बरीचशी वृत्तपत्रे निघत होती पण हैद्राबाद राज्यामधून मात्र एकही आर्य समाजी वृत्तपत्र प्रकाशित होत नव्हते. त्याला कारण निजाम सरकारचे धोरण. त्यामुळे निजामास शह देण्यासाठी समाजाकडे एखादे मुखपत्र असण्याची गरज होती. अखेर ब-याच प्रयत्नांनंतर सरकारने आर्य समाजास वृत्तपत्र काढण्यासाठी परवानगी दिली. त्यानुसार ७ डिसेंबर, १९३४ रोजी `वैदिक आदर्श` या नावाने वृत्तपत्र निघाले( याचे संपादक श्री. चंदुलालजी

होते. पण संपादनाची पूर्ण जबाबदारी पं. नरेंद्रजी यांच्यावरच होती. माई सोहनलाल व ठाकूर उमराव सिंह यांनी त्यासाठी सहकार्य दिले. पण ध्रुव पेठ येथील दंगलीबाबत वरील दोघे व अन्य २४ जणांवर सरकारने खटला दाखल केला.

` वैदिक आदर्श ` हे आर्य समाजाच्या साहसी वृत्तीचे व निर्भयतेचे प्रतिक होते. रहबरे दक्खन , अल आलम या निजाम धार्जिण्या उर्दू वृत्तपत्रांना सडेतोडपणे उत्तरे देण्यात आर्य समाजाचे उर्दू साप्ताहिक वैदिक आदर्श यशस्वी ठरू लागले. इ.स. १९३४ मध्ये हल्ली खेड येथे आर्य समाजी कार्यकर्ते तसेच पं. रामचंद्रजी देहलवी यांच्यावर सरकारने रचलेल्या खटल्याबाबत सत्य स्थिती उजेडात आणण्यामध्ये ` वैदिक आदर्श ` ने निर्भयता दाखवली. तेव्हा मात्र या वृत्तपत्राविरुध्द हाकाटी सुरू झाली. हे कार्य सरकार धार्जिण्या वृत्तपत्रामधून होऊ लागले. यावेळी ` दक्खन न्यूज ` या वृत्तसंस्थेने मोठया प्रमाणात मुस्लीम धार्जिणा प्रचार सुरू केला. हैद्राबाद राज्याचे तेव्हाचे प्रधान सर अकबर हैदरी (१९३७-४१) याना असा प्रचार अयोग्य वाटला. पण तरीही हा विषारी प्रचार चालूच राहिला. ` वैदिक आदर्श ` ने मात्र अत्यंत संयमाने व शांततेने आपले कार्य चालूच ठेवले. ` वैदिक आदर्श ` चा हा प्रभाव निजाम सरकारला सहन न झाल्याने इ.स. १९३५ मध्ये त्यावर बंदी घालण्यात आली. इतकेच नव्हे तर वैदिक आदर्शचे अंकही जप्त करण्यात आले.

आर्य प्रतिनिधी सभेने हे वृत्तपत्र पुन्हा सुरू करण्याबाबत परवानगी मागितली. आणि त्यासाठी सरकारच्या अटी मान्य करण्याचे ठरवले. पण एवढे करूनही सरकार तयार झाले नाही. तेंव्हा सभेने ब्रिटिश प्रांतामधून वृत्तपत्र प्रकाशित करण्याचे ठरवले. त्यानुसार सोलापूर येथून इ.स. १९३७ मध्ये वैदिक आदर्श नावाचे पहिले हिंदी वृत्तपत्र प्रसिध्द करण्यात आले. त्याचे पहिले संपादक श्री. त्रिलोकचंद शास्त्री होते. पण ते पंजाबला निघून गेल्यानंतर श्री. ठाकूर उमराव सिंह (हैद्राबाद) यानी हे कार्य पार पाडले. त्यांच्या पश्चात श्री. रामदेवजी शास्त्री यांनी हे संपादन कार्य अत्यंत निष्ठापूर्वक हाताळले.

त्यानंतर हे पत्र ` आर्यभानु ` नावाने हैद्राबाद मधून प्रकाशित होऊ लागले. पं.बॅ. विनायकराव विद्यालंकार यांच्या नेतृत्वाखाली व पं. कृष्णदत्तजी एम.ए. यांच्या संपादनाखाली हे वृत्तपत्र प्रकाशित होऊ लागले. ` आर्यभानु ` हे हैद्राबाद राज्यातील हिंदीमधून आर्य समाजाचा प्रचार करणारे एकमेव वृत्तपत्र होते.[३३]

आर्य प्रतिनिधी यापुढे हैद्राबाद राज्याबाहेर निघणारी वृत्तपत्रे काढण्याचा निश्चय केला. कारण हैद्राबाद राज्यात आर्य समाजावर निजामाची अनेक बंधने होती. तेथे ` वैदिक आदर्श ` चीही गळचेपी झाली. तेव्हा ` आर्य प्रतिनिधी ` सभेने ६७०२-११-८१-२ या ठरावानुसार सोलापूर येथे एक प्रिंटिंग प्रेस उभा केला. तेथूनच सभेचे सर्व साहित्य मुद्रित व प्रकाशित होऊ लागले.[३४] सोलापूर हे आर्य समाजाच्या प्रचार चळवळीचे एक प्रमुख केंद्र होते. येथून प्रकाशित होणारी वृत्तपत्रे हैद्राबाद राज्यात जात असत. तेंव्हा सरकारकडून त्यावर बंधने लादली जाऊ लागली. जेंव्हा वैदिक आदर्शावर बंदी घालण्यात आली तेव्हा ते ` वैदीक संदेश ` या नावाने निघू लागले. बंदी टाकली की ते नाव बदलून ही पत्रके राज्यात प्रकाशित होत व निजामी सत्तेचे खरे स्वरूप उघडे पाडण्याचा निर्भयपणे प्रयत्न करीत असत. अशा रितीने सोलापूर येथून प्रसिध्द होणारे वृत्तपत्र प्रथम ` दिग्वीजय,` नंतर ` विवृत्ती ` व त्यानंतर ` आर्य मानू ` या नावाने प्रकाशित होत होते.

सोलापूरहून प्रकाशित होणा-या ` वैदिक संदेश ` व ` सुदर्शन ` या आर्य समाजाच्या मुखपत्रांद्वारे लढयाची माहिती, सूचना वगैरे लोकांपर्यन्त पोहचू लागल्या. ` वैदिक संदेश ` ने तर ` निजाम सरकारके काले कानून ` हे पुस्तक प्रसिध्द केले. हैद्राबाद स्टेटमधील उस्मानाबाद जिल्हात ज्यांच्यावर भाषण बंदी व लेखन बंदी हुकूम जारी केला आहे अशा तेरा लोकांची नावे जाहीर करण्यात आली. त्यात राम पांढरे (मुरूम-उस्मानाबाद) यांचे नाव समाविष्ट होते. ` नागवार बागी ` (मुर्खाचे बंड) म्हणून या तेरा व्यक्तींना निझाम सरकारने नोटीला दिल्या होत्या.[३५]

निजामी राजवटीच्या अखेरच्या पर्वात हैद्राबाद राज्यात आर्य समाजी लोकांची कशी कुचंबणा होत होती हे सांगताना डॉ. संजीव देसाई म्हणतात, " १९४२ ते १९४८ या काळात आर्य समाजिस्टांची संभावना बंडखोर, विद्रोही म्हणून करण्यात येऊ लागली. त्यांच्यावर अनेक बंधने घालण्यात आली. उर्दू वृत्तपत्रातून त्यांच्या विरुध्द रकानेच्या रकाने प्रसिध्द होऊ लागले. आर्यजनांना त्यांचे स्वत:चे वृत्तपत्र किंवा प्रकाशन काढण्यास बंदी होती. बाहेर ब्रिटिश हद्दीत त्यांच्या संबंधी काही चांगले छापून आले तर निजाम हद्दीत त्या लिखाणास प्रवेश नाकारण्यात येत होता. "[३६] जर एखादा इतर वृत्तपत्राने अथवा आर्य समाजी वृत्तपत्राने निजामाचा प्रतिकूल लिखाण केले तर सरकार लगेच त्याचे कात्रण जमा करीत असे.

आर्य समाजाने प्रेस विभाग व समाचार विभाग सोडून इतर महत्वपूर्ण विभाग हैद्राबाद येथेच ठेवले होते. ' आर्य भानू ' हे वृत्तपत्र सोलापूर येथे छापून नागपूर मधून प्रकाशित केले जात असे. सोलापूर येथील प्रेस विभागाची व्यवस्था श्री. अशोककुमार यांच्याकडे होती. समाचार विभागाची व्यवस्था श्री.वसंतराव पवार यांच्याकडे सोपविण्यात आली होती.

इ.स. १९४३ मध्ये आर्य प्रतिनिधी सभेने समाचार व प्रेस विभागासाठी पं.डी.आर. दासजी यांची नियुक्ती केली होती. सोलापूर येथील प्रिंटींग प्रेस मधून आर्य समाजाची वृत्तपत्रे व प्रचार साधने छापून प्रकाशित केली जात होती. सोलापूर हे ठिकाण तत्कालीन मुंबई प्रांतात होते. शिवाय हैद्राबाद राज्याचा सीमावर्ती भागाला नजीक होते. सोलापूर हे ठिकाण उस्मानाबाद या मराठवाड्यातील जिल्हास जवळच असल्यामुळे ही सर्व वृत्तपत्रे व प्रकाशित साहित्य याचा प्रसार व प्रचार मराठवाड्यामध्ये व्हावयाचा. जनजागृती बरोबरच शिक्षण प्रसारात त्या साधनानीही महत्वपूर्ण कार्य केले. आर्यभानुच्या संपादक मंडळामध्ये श्री.पं. कृष्णदत्तजी, श्री. अशोककुमार, श्री. प्रशांत प्रभाकर इ. चा समावेश होता. तर प्रकाशन विभागाची कामगिरी श्री. पं. नरेंद्रजी यांच्यावर सोपविण्यात आली होती.

" आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद यांच्याकडून सरकारला " दक्षिण केसरी " नावाचे उर्दू साप्ताहिक व दैनिक पत्र काढण्याबाबत एक प्रार्थना पत्र दिनांक २३-६-१३५१ फसलीस देण्यास आले. त्यानंतर अनेक स्मरणपत्रे पाठविण्यात आली. शेवटी श्री. मंत्रीजी (आर्य प्रतिनिधी सभा) हे मोतिमद साहेब यांना स्वत: भेटले. त्यानंतर ता. १४-११-१३५१ फसली द्वारे (जहीर) नि. १३०१/पी.सी. मुरासल (पत्र) पाठवून त्यामध्ये लिहले की नवे समाचार पत्र काढण्याबाबत परवानगी दिली जाणार नाही. तेव्हा सभेच्या वतीने पुन्हा सरकारने यावर दुसऱ्यांदा विचार करावा अशी विनंती करण्यात आली. कारण " मीजान " हे वृत्तपत्र तीन भाषेत प्रकाशित करण्यास परवानगी दिली होती. ही कारवाई फार पूर्वी केली होती. त्या व्यतिरिक्त " वक्त " डेक्कन क्रॉनिकल " आणि " सलतनत " इ. नाही पुन्हा प्रकाशित करण्याची परवानगी दिली होती. "[३७]

" सरकारने या उत्तरात ग.सं. ६११/पी.सी. ता. ७-६-५३ फ. ला एक कम्युनिके नि ४ ता. २४-३-५३ फ. हवाला देऊन लिहले होते की, सरकारकडे कागद पुरवठा कमी असल्यामुळे नवे समाचार प्रकाशित करण्यास परवानगी दिली जाणार नाही. वृत्तपत्र " मीजान " ला काही महिन्यापूर्वी परवानगी दिली गेली आहे. "[३८] यावरून एकच सिध्द होते की, सरकारला आपल्या विरोधात लिहिणाऱ्या किंबहुना आर्य समाजाच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रास परवानगी द्यावयाची नव्हती.

भाई हुतात्मा श्यामलालजीच्या स्मृतिप्रित्यर्थ पं. नरेंद्रजीच्या व्यवस्थापनाखाली श्यामलाल प्रकाशन विभाग स्थापन करण्यात आला. त्यामार्फत खालील पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

१) क्यो पर यह छेड छाड क्यों ? (हिंदी)

२) सत्यार्थ प्रकाश को विरोध क्यों ? (हिंदी)

३) उपन्यास गुच्छमु (तेलगु)

४) आर्य समाज के दस नियम, (हिंदी) - लेखक श्री. मदनमोहनजी विद्यासागर[३९]

या शिवाय आर्य समाजाची गीता-सत्यार्थ प्रकाश - याचेही प्रांतीय भाषेत भाषांतर करून प्रकाशित करण्यात आले. प्रकाशन विभागाने आंध्र प्रदेशातील लोकांच्या इच्छेला मान देऊन ` सत्यार्थ प्रकाश ` ग्रंथाचा तेलगुमध्ये अनुवाद केला. पुरेसा निधी जमा झाला नाही म्हणून कर्ज काढून सत्यार्थ प्रकाशच्या ३००० प्रती छापण्यात आल्या. त्या प्रतींच्या विक्रीनंतर कर्जफेड करण्यात आली. इ.स. १९४५ मध्ये प्रेसमधून कशाही प्रकारचा फायदा नाही हे लक्षात आल्यानंतर अंतरंग सभेच्या निश्चयानुसार सोलापूर येथील प्रेस विकून टाकण्यात आली.

आर्य प्रतिनिधी सभेने वैदिक आदर्शाच्या बंदीनंतर आर्य प्रतिनिधी सभेने सरकारकडे हैद्राबाद राज्यात वृत्तपत्रे काढण्यास वारंवार परवानगी मागितली. सभेने हे वृत्तपत्र हिंदी, उर्दू अथवा दुसऱ्या कोणत्याही स्थानिक भाषेत प्रकाशित केले जाईल असा आपला मनोदय कळविला.

अखेर अनेक वर्षांच्या मागणीनंतर सभेस सरकारकडून हैद्राबादमध्ये प्रकाशनास परवानगी मिळाली. या परवानगीनंतर ` आर्य भानू ` हे मासिक ऐवजी साप्ताहिक म्हणून प्रकाशित करण्यात येऊ लागले. याचे संपादक पं. विनायकरावजी आणि सहाय्यक संपादक पं. कृष्णदत्तजी होते.[४०] आर्य भानूमधून सरकारांच्या कारवाया तसेच वैदिक सिध्दांताबाबतचे लिखाण प्रांजळपणे व निर्भयपणे प्रकाशित केले जाऊ लागले.

आर्य सेवा समितीने कॉंग्रेसच्या आंदोलन कार्यास हैद्राबाद राज्यात सहकार्य दिले. इतकेच नव्हे तर प्रचार कार्याची जबाबदारीही आर्य समाजी कार्यकर्ते पं. कृष्णदत्तजी (हैद्राबाद) यांनी स्विकारली. तसेच दैनंदिन निघणारी बुलेटिन्स

ही भारतामधील सर्व आर्य समाजी दैनिक, साप्ताहिक पत्रातून प्रकाशित केली जात असत. वृत्तपत्रे व प्रकाशित केलेल्या साहित्याच्या माध्यमातून आर्य समाजाने राज्यात धार्मिक, राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रात जागृती निर्माण केली. मराठवाड्यामधून निघणाऱ्या अनेक वृत्तपत्रांनीही या प्रकारच्या जागृतीचे कार्य केले.

मीर उस्मान अली खान (१९११-१९४८) याचा काळ हा आर्य समाजाच्या दृष्टीने अत्यंत संघर्षाचा काळ ठरला. त्याने उर्दूच्या नावावर उघड उघड पक्षपात आणि अन्य भाषांवर उघडपणे अतिक्रमण केले. मराठवाड्यात त्याच्या काळात अनेक राष्ट्रीय शाळा, ग्रंथालये, वसतिगृहे, खाजगी शाळा निघाल्या होत्या. शैक्षणिक प्रगतीच्या व प्रसाराच्या कार्यात मराठवाड्यात आर्य समाजाने उल्लेखनीय कामगिरी बजावली.

आर्य समाजाच्या मराठवाड्यातील शिक्षण प्रसाराच्या कार्यामुळे अनेक तरुणांना शिक्षणाचा लाभ मिळाला तर कन्या शाळांच्या रूपाने स्त्रीयांना शिक्षण मिळण्याची व्यवस्था झाली. मराठवाड्यात आर्य समाजाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या अनेक शाळा, गुरुकुल, वाचनालये, हिंदी भाषा प्रचार इ. मुळे लोकांच्यात जागृती घडून येण्यास फार मोठी मदत झाली. इतकेच नव्हे तर अशा जागृतीमुळे हैद्राबादच्या निजाम सरकारच्या कुटिल कारवाया विविध स्वरूपात लोकांच्या समोर येऊ लागल्या. अशा शैक्षणिक कार्यामुळेच हैद्राबाद मुक्तीसंग्रामात मराठवाडा हा आघाडीवर होता. म्हणूनच हैद्राबाद राज्यातील आर्य समाजाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्यात मराठवाड्यातील त्यांचे कार्य गौरवास्पद आहे.

## संदर्भ


१) मालेराव अनंत, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, पृ. ५७.

२) पोतदार वसंत ब. - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, पृ. २३
(लेखकाने सदर अवतरणातील आकडेवारी इ.स. १९३१ च्या खानेसुमारीच्या आधारे दिली असावी.)

३) गर्गे स.मा. - संघर्ष खंड पहिला (१९३६ ते १९४७), पृ. २२४.

४) किंवा, पृ. २२४.

५) किंवा, पृ. २२८.

६) काटे पी.व्ही. - मराठवाड्यातील समाज प्रबोधन (१९०० ते १९४८), भारतीय इतिहास आणि संस्कृती, जाने. मार्च, १९८६, पृ. ३९.

७) स्नेही नरदेव व तेरकर पां.व्यं. - आर्य समाज : समाजकारण आणि राजकारण, प्रा. भगवान काळे (सं.) मराठवाडा काल आणि आज ग्रंथातील लेख, पृ. २८७.

८) आर्य जीवन संमेलन विशेषांक, जुलै, १९७१, पृ. ५१-५२.

९) तिवारी प्रमोद प्रसाद (श्री. गोकुळ प्रसाद तिवारी यांचे नातू) किल्ले धारूर, जि. बीड यांची दि. २९-६-१९८७ रोजी घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत.

१०) वेदालंकार वेदकुमार (उस्मानाबाद) यांची दि. १८-११-१९८६ रोजी घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत.

११) आर्य भानू, दि. ६ सप्टेंबर, १९४८.

१२) वानप्रस्थी उत्तममुनीजी (उस्मानाबाद) आर्य समाजाचे जुनेकार्यकर्ते, यांच्या दि. १८-११-१९८६ रोजी घेतलेल्या प्रत्यक्षमुलाखती आधारे.

१३) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का वार्षिक कार्य विवरण (१९३१ से १९४०), पृ. ४८.

१४) आर्य जीवन संमेलन विशेषांक - उ.नि.पृ. ६०.

१५) मालेराव अनंत - उ.नि.पृ. ५३.

१६) विद्यालंकार जयदेव शर्मा, साहित्यालंकार सूर्यदेव शर्मा - हैद्राबाद सत्याग्रह का रक्तरंजित इतिहास, पृ. ५७,५८.

१७) किंवा, पृ. ७३.

१८) आर्य जीवन संमेलन विशेषांक - उ.नि.पृ. ६०.

१९) किंवा, पृ. ७४.

२०) किंवा, पृ. ६७.

२१) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद राज्य का चौदहवाँ वार्षिक विवरण (१९४४ से १९४९), पृ. ३५.

२२) किंवा, पृ. ६.

२३) पं. कृष्णदत्तजी, नलाकुंटा, हैद्राबाद यांचे दि. २७-८-१९८७ चे पत्र.

२४) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का वार्षिक कार्य विवरण (१९३१ से १९४०), पृ. ३२.

२५) दिग्वीजय, दि. ९-११-१९३९, 'आर्य समाज टुडे इन हैद्राबाद' हा लेख पहा.

२६) शर्मा सार्नेंद्र - आर्य समाजी कार्यकर्ते, सरस्वती भुवन,कॉलनी, औरंगाबाद यांची दि. ७-८-१९८८ रोजी घेतलेली प्रत्यक्ष मुलाखत.

२७) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद राज्य का चौदहवाँ वार्षिक विवरण (१९४४ से १९४९), पृ.४.

२८) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का वार्षिक विवरण (१९३१ से १९४०), पृ. ५९.

२९) निजाम डिफेन्स - एक्झामिनड ॲन्ड एक्सपोझड्, पृ. ५१

३०) किंवा, पृ. ५१

३१) किंवा, पृ. ५२.

३२) किंवा, पृ. ५४.

३३) पं. नरेंद्र - हैद्राबाद के आर्यों की साधना और संघर्ष, पृ. ८१.

३४) आर्य प्रतिनिधीसभा, हैद्राबाद स्टेट का वार्षिक कार्य विवरण (१९३१ से १९४०), पृ. ४७.

३५) पोतदार वसंत ब. - उ.नि.पृ. ३७.

३६) देसाई संजीव प. - हैद्राबाद संस्थान व मराठवाड्यातील आर्य समाज चळवळ, भारतीय इतिहास आणि संस्कृती, जाने. मार्च, १९८८, पृ. ३९.

३७) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का तेरह्वा वार्षिक विवरण (१९४३-१९४४), पृ. २५.

३८) किंवा, पृ. २६.

३९) किंवा, पृ. ३१.

४०) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का चौदह्वाँ विवरण (१९४४ से १९४९), पृ. २५.